# महाराष्ट्र विधानसभा

## दुसरे अधिवेशन, २०१८

---

## अतारांकित प्रश्नोत्तरांची यादी

**प्रश्नांची एकूण संख्या - ५०**

---

### महात्मा गांधी राष्ट्रीय ग्रामीण रोजगार हमी योजनेंतर्गत रत्नागिरी जिल्ह्यात २४७ शेततळी बांधण्याबाबत

**(१) ५२३५ (३०-११-०००२). श्री.अमित विलासराव देशमुख (लातूर शहर) :** सन्माननीय **रोजगार हमी मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) महात्मा गांधी राष्ट्रीय ग्रामीण रोजगार हमी योजनेंतर्गत रत्नागिरी जिल्ह्यात २४७ शेततळी बांधण्यासाठी ३ कोटी ४२ लाख ९ हजार रुपयांची तरतूद करण्यात आली आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, चालू आर्थिक वर्ष संपत आले तरी जिल्ह्यातील शेततळ्याचे एकही काम करण्यात आले नसल्याचे निदर्शनास आले आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, पावसाचे पाणी साठवण्याची कोणतीही उपाययोजना नसल्याने त्याचा परिणाम उन्हाळ्यातील पाणीटंचाई व शेतीच्या उत्पन्नावर होतो, हे ही खरे आहे काय,

(४) असल्यास, रत्नागिरी जिल्ह्यात २४७ शेततळी बांधण्याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. जयकुमार रावल (०९-०७-२०१८) :** (१) होय.

(२) होय.

(३) नाही.

पावसाचे पाणी साठवण्यासाठी कोरडवाहू क्षेत्र विकास प्रकल्प, जलयुक्त शिवार तसेच एकात्मिक पाणलोट विकास योजनेतून अनघड दगडी बांध, सलग समतल बांध, सिमेंट नाला बांध इ. जलसंधारणाची कामे कृषी विभागामार्फत हाती घेण्यात येत आहेत.

(४) शेततळी होण्याकरीता तालुकास्तरावरुन योजनेची व्यापक प्रचार व प्रसिध्दी करण्यात आलेली आहे. व आताही प्रचार प्रसिध्दी जिल्हा अधिक्षक कृषी अधिकारी कार्यालयाकडून करण्यात येत आहे.

(५) प्रश्न उद्भवत नाही.

---

**ठाणे व पालघर जिल्ह्यातील महात्मा गांधी राष्ट्रीय ग्रामीण रोजगार हमी योजनेअंतर्गत विहीर बांधण्याच्या कामात झालेला गैरव्यवहार**

**(२) ७२९६ (३०-११-०००२). श्री.किसन कथोरे (मुरबाड), श्री.संदीप नाईक (ऐरोली), श्री.जितेंद्र आव्हाड (मुंब्रा कळवा), श्री.पांडुरंग बरोरा (शहापूर), श्री.रमेश कदम (मोहोळ) :** सन्माननीय **रोजगार हमी मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) ठाणे व पालघर जिल्ह्यातील महात्मागांधी राष्ट्रीय ग्रामीण रोजगार हमी योजनेअंतर्गत विहीर बांधण्याच्या ४६३५ कामांना मंजूर देण्यात आली असून २५९६ कामे सुरु झाली आहेत व २०३९ कामे अद्यापही सुरु न झाल्याने या सिंचन विहींरीमध्ये गैरव्यवहार झाल्याचे माहे डिसेंबर, २०१४ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आले, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, याबाबत शासनाने चौकशी केली आहे काय,

(३) असल्यास, चौकशीअंती काय निदर्शनास आले व तदनुसार सिंचन विहीरींची कामे न करणा-या कंत्राटदार व संबंधित अधिका-यांवर कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. जयकुमार रावल (०९-०७-२०१८) :** (१) अंशत: खरे आहे.

एकत्रित ठाणे जिल्हा असल्यापासून जिल्हयात ३८३० विहीरी मंजूर झाल्या होत्या. त्यापैकी २३५२ विहीरींची कामे सुरु आहेत. मंजूरपैकी सुरु न झालेल्या १४७८ विहिरींची सद्य:स्थिती खालीलप्रमाणे आहे.

| तालुका | सन २०११-१२ ते जुलै २०१७ मंजूर विहीरी | मंजूर पैकी सुरु न केलेल्या विहीरी | विहीरी सुरु न होण्याची कारणे. |
|---|---|---|---|
| जव्हार | १५४ | १ | लाभार्थी बाहेरगावी असल्याने प्रलंबित. |
| मोखाडा | १७३ | ७२ | ७ मार्च,२०१५च्या शा.प. नुसार प्रशासकीय मान्यता रदद केली. |
| विक्रमगड | ७६९ | ४१ | ऑक्टो.२०१७ पासून काम सुरु केले आहे. |
| वसई | २२९ | १४३ | विहीरी शेल्फवर असून काम सुरु करण्याची मागणी प्राप्त होताच कामे सुरु करण्यात येतील. |
| पालघर | ४१४ | २७४ | लाभार्थ्यांनी मागणी न केल्याने विहीर सुरु होऊ शकल्या नाहीत. |

| | | | |
|---|---|---|---|
| डहाणू | ९९६ | ४८८ | विहीरी शेल्फवर असून काम सुरु करण्याची मागणी प्राप्त होताच कामे सुरु करण्यात येतील |
| तलासरी | २७६ | १२८ | ७ मार्च, २०१५ च्या शासन परिपत्रकानुसार प्रशासकीय मान्यता रदद करण्यात आली आहे. |
| वाडा | ८१९ | ३३१ | २४९ विहीरी रदद करण्यात आल्या व ८२ कामांची मागणी येता सुरु करण्यात येतील. |
| एकूण | ३८३० | १४७८ | |

(२) व (३) एकत्रित ठाणे जिल्हा असतांना विक्रमगड तालुक्यात सन २०११-१२ साली अनियमितता झाली असून ४३ ग्रामपंचायतीमधील ३५ ग्रामसेवकांवर जि.प.ठाणे यांनी दोषारोप बजावण्यात आले आहेत. संबंधितांवर पुढील कार्यवाही ग्रामपंचायत विभाग जिल्हा परिषद पालघर यांच्या स्तरावर सुरु आहे. कार्यवाही पुर्ण होताच तसा अहवाल सादर करण्यात येईल.
(४) प्रश्न उद्भवत नाही.

---

**पालघर जिल्हा, जव्हार, तलासरी तालुक्यात मध्ये मनरेगातंर्गत ६०० सिंचन विहिरी व रोजगार हमी योजनेत झालेला गैरव्यवहार**

**(३) २५७८४ (३०-११-०००२). श्री.पास्कल धनारे (डहाणू) :** सन्माननीय **रोजगार हमी मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) जव्हार, तलासरी (जि.पालघर) तालुक्यात सन २०११-१२ मध्ये मनरेगातंर्गत ६०० सिंचन विहिरी व रोजगार हमी योजनेत गैरव्यवहार तसेच साहित्य खरेदीबाबत लाभार्थ्यांना न कळविता ४ वर्षे मुल्यांकन केलेले नसल्याचे दिनांक १३ मे, २०१५ व दिनांक १३ जून, २०१५ रोजी वा त्यासुमारास निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, सिंचन विहिरांना सन २०११-१२ मध्ये मंजूरी असताना अद्याप पूर्ण न होण्याची कारणे काय आहेत,
(३) असल्यास,सदर प्रकरणी शासनाने कोणती चौकशी केली आहे व त्यात काय आढळून आले,
(४) असल्यास, संबंधित कर्मचारी व अधिकारी यांच्यावर शासनाने कोणती काय कारवाई केली वा करण्यात येत आहे,
(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. जयकुमार रावल (०९-०७-२०१८) :** (१) हे खरे नाही.

जव्हार व तलासरी तालुक्यात (जि.पालघर) महात्मा गांधी राष्ट्रीय ग्रामीण रोजगार हमी योजनेंतर्गत सन २०११-१२ ते माहे जुलै, २०१७ अखेर पर्यंत ४३० विहिरी मंजूर करण्यात आल्या होत्या. त्यापैकी ३०१ विहिरींची कामे सुरु करण्यात आली असून १५७ विहीरी पूर्ण झाल्या आहेत व १४४ विहिरी प्रगतीपथावर आहेत.

(२) मंजूर पैकी सुरु न करण्यात आलेल्या विहिरी १२९ असून त्यापैकी एका विहिरीचे काम लाभार्थीच्या वैयक्तिक कारणास्तव सुरु करण्यात आले नव्हते. अपूर्ण विहिरीसंदर्भात मागील ४ वर्षात ग्रामसेवक/ग्रामरोजगार सेवक व शाखा अभियंता यांनी प्रत्यक्ष जागेवर भेट देवूनही लाभार्थ्यांनी विहिरींची कामे सुरु करण्यास इच्छुकता दाखविली नाही. कामाची मागणी प्राप्त न झाल्याने १२८ पैकी ७ कामे शेल्फवर ठेवून उर्वरित १२१ अपूर्ण विहिरी शासन परिपत्रक मग्राराहेयो / २०१५/प्रक्र.७/ मग्रारोहयो-१, दि. ०७ मार्च, २०१५ नुसार पंचायत समिती तलासरी कार्यालयाने दि. २२.१.२०१६ च्या पत्रान्वये रदद केल्या आहेत.

(३), (४) व (५) प्रश्न उद्भवत नाही.

---

## पॅरामेडीकल पदवी अभ्यासक्रम पूर्ण करणा-या विद्यार्थ्यांना आरोग्य विभागाच्या विविध पदभरती परीक्षेसाठी अपात्र ठरविण्यात आल्याबाबत

**(४) ४८१९४ (३०-११-०००२). श्री.हर्षवर्धन सपकाळ (बुलढाणा) :** सन्माननीय **वैद्यकीय शिक्षण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) वैद्यकीय क्षेत्रातील तांत्रिक कुशल मुनष्यबळाची कमतरता भरून काढण्यासाठी शासनाने सन २००९ पासून पॅरामेडीकल पदवी अभ्यासक्रम सुरू केले आहेत, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, सदर अभ्यासक्रम पूर्ण करणाऱ्या विद्यार्थ्यांना आरोग्य संचालनालयाने माहे डिसेंबर, २०१५ मध्ये प्रसिध्द केलेल्या सरळ सेवाभरतीत विविध पदाच्या परीक्षेसाठी अपात्र ठरविले आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, त्याची कारणे काय आहेत,

(४)असल्यास, उक्त विद्यार्थ्यांसाठी फेरपरीक्षा आयोजित करण्याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. गिरीष महाजन (१२-०७-२०१८) :** (१) होय, हे खरे आहे.

(२) सार्वजनिक आरोग्य विभागांतर्गत गट-क व गट-ड ची सरळसेवा भरती प्रक्रिया संवर्गाच्या सेवाप्रवेश नियमानुसार राबविली जाते. सेवा प्रवेश नियमामध्ये विहित केलेल्या शैक्षणिक अर्हतेशी समतुल्य / समकक्ष असणा-या अभ्यासक्रम पूर्ण केलेल्या सर्व उमेदवारास परीक्षेकरिता पात्र ठरविण्यात आले होते.

(३) प्रश्न उद्भवत नाही.

(४) प्रश्न उद्‌भवत नाही.
(५) प्रश्न उद्‌भवत नाही.

---

**राज्यातील दंत वैद्यकीय महाविद्यालयाला परवानगी न देण्याच्या डेन्टल काऊन्सिल ऑफ इंडियाच्या निर्णयाबाबत**

**(५) ६२९३८ (३०-११-०००२). श्री.गोवर्धन शर्मा (अकोला पश्चिम), डॉ.संजय कुटे (जळगाव जामोद), श्री.राजेंद्र नजरधने (उमरखेड), श्री.डि मल्लीकार्जून रेड्डी (रामटेक) :** सन्माननीय **वैद्यकीय शिक्षण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) राज्यातील दंत वैद्यकीय महाविद्यालयाला यापुढे परवानगी न देण्याच्या डेन्टल काऊन्सिल ऑफ इंडियाच्या निर्णयाचा परिणाम राज्यातील ४६ महाविद्यालयांवर होणार असल्याचे माहे जून,२०१६ मध्ये वा त्या दरम्यान निदर्शनास आले, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, गतवर्षी वाशिम येथे शासकीय दंत वैद्यकीय महाविद्यालय सुरु करण्याची घोषणा शासनाने केली होती, त्याचबरोबर खासगी आणि अभिमत विद्यापीठांशी संलग्न असलेली ४५ महाविद्यालये नव्याने सुरु करण्याचे प्रस्तावही प्रलंबित असल्याची शक्यता आहे, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, ग्रामीण भागात दंत वैद्यकीयांची संख्या पुरेशी नसतानाही डेन्टल काऊन्सिल ऑफ इंडियाने घेतलेल्या निर्णयाबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे काय,
(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. गिरीष महाजन (१२-०७-२०१८) :** (१) नाही, हे खरे नाही.
(२) वाशिम येथे शासकीय दंत महाविद्यालय सुरु करण्याकरिता शासन निर्णय दिनांक १६/०२/२०१६ नुसार समिती गठीत करण्यात आलेली आहे. सदर समितीचा अहवाल प्राप्त झाला आहे. समितीच्या अहवालानुसार भारतीय दंत परिषदेच्या दिनांक २१.०५.२०१२ च्या अधिसूचनेमधील Principle regulation २००६ (६)(२)(h) नुसार नवीन दंत महाविद्यालय सुरु करण्याकरिता शासकीय अथवा खाजगी वैद्यकीय महाविद्यालयाशी संलग्नता असणे आवश्यक आहे. सद्य:स्थितीत वाशिम येथे शासकीय वैद्यकीय महाविद्यालय नाही.
खाजगी व अभिमत विद्यापीठांशी संलग्न महाविद्यालयांचे कोणतेही प्रस्ताव शासनाकडे प्रलंबित नाहीत.
(३) व (४) प्रश्न उद्‌भवत नाही.

---

**शासकीय आयुर्वेदिक महाविदयालय व रूग्णालयामधील २६० खाटा वाढविण्याच्या प्रस्तावाला मंजुरी मिळाली नसल्याबाबत**

**(६) ७८१४१ (१८-०४-२०१७). श्री.सुधाकर देशमुख (नागपूर पश्चिम) :** सन्माननीय **वैद्यकीय शिक्षण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) नागपूर शहरातील शासकीय आयुर्वेदिक महाविदयालय व रूग्णालयामधील २६० खाटा वाढविण्याच्या प्रस्तावाला मागील दोन वर्षापासुन मंजुरी मिळाली नसल्याबाबतची बाब माहे जानेवारी, २०१७ मध्ये वा त्यादरम्यान दरम्यान निदर्शनास आली आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, या आयुर्वेदिक रूग्णालयात सदया स्थितीत १८० आंतररूग्णावर उपचार केला जात आहे परंतु नागरीकांच्या आयुर्वेदबाबतचा वाढता विश्वास बघता त्यामध्ये बाहय रूग्णासह आंतर रूग्णाचा संख्येत सुध्दा वाढ होत आहे, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, या रूग्णालयात ही खाटांची संख्या अपुरी पडत असल्यामुळे रुग्णाची गैरसोय होत आहे, हे ही खरे आहे,
(४) असल्यास, या आयुर्वेदिक रूग्णालयात खाटांची अपुरी पडत असल्याने त्यांच्या वाढीव मान्यतेच्या प्रस्तावाला अदयापर्यंत मंजुरी न मिळण्याची कारणे काय आहेत ?

**श्री. गिरीष महाजन (०४-०७-२०१८) :** (१) हे अंशत: खरे आहे.
(२) हे खरे आहे.
(३) हे खरे नाही. रुग्णसंख्येत वाढ असली तरी आंतररुग्ण विभागात पुर्ण (१०० टक्के) खाटा व्याप्त होत नसल्यामुळे रुग्णाचे हाल होत आहे, ही बाब खरी नाही.
(४) प्रश्न उद्‌भवत नाही.

---

**भिवंडी (जि.ठाणे) येथील शेतकऱ्यांनी विषारी कीटकनाशक पिऊन केलेली आत्महत्या**

**(७) ७८७६५ (१३-०४-२०१७). श्री.भारत भालके (पंढरपूर), श्री.अमिन पटेल (मुंबादेवी), श्री.राधाकृष्ण विखे-पाटील (शिर्डी), श्री.अस्लम शेख (मालाड पश्चिम), डॉ.संतोष टारफे (कळमनुरी) :** सन्माननीय **मदत व पुनर्वसन मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) भिवंडी (जि.ठाणे) येथील शेतकरी गौरु भागा शेलार यांनी विषारी कीटकनाशक पिऊन आत्महत्या केल्याचे दिनांक ३० डिसेंबर,२०१६ रोजी वा त्यासुमारास निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,
(२) यासंदर्भात शासनाने चौकशी केली आहे काय,
(३) असल्यास, चौकशीनुसार उक्त मृत शेतक-यांच्या कुटूंबियांना आर्थिक मदत देण्याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. चंद्रकांत पाटील (०६-०७-२०१८) :** (१) गौरु भागा शेलार यांनी दि.१७.१२.२०१६ रोजी किटकनाशक प्राशन केले. उपचारादरम्यान दि.२४.१२.२०१६ रोजी त्यांचा मृत्यु झाला आहे, हे खरे आहे.

(२) व (३) सदर प्रकरणात चौकशी केली असता सदर शेतकऱ्यांच्या नावे सुर्यानगर या गावी एकूण क्षेत्र ०.२६.० एवढी जमीन असून त्यांच्या कुटुंबात एकूण ६ व्यक्ती आहेत. सदर शेतकऱ्याने कर्जबाजारीपणा, नापिकीमुळे किंवा कर्जाचा तगादा या तीन कारणांमुळे आत्महत्या केली नसून त्यांचे घरातील कौटुंबिक कारणास्तव आत्महत्या केली आहे. त्यामुळे मदत देण्याचा प्रश्न उद्‌भवत नाही.
(४) प्रश्न उद्‌भवत नाही.

---

## राळेगाव (जि.अमरावती) येथील तालुका कृषी अधिका-याने निधीचा अपहार केल्याबाबत

**(८) ८१३०० (१३-०४-२०१७). श्री.ओमप्रकाश ऊर्फ बच्चू कडू (अचलपूर), डॉ.अनिल बोंडे (मोर्शी) :** सन्माननीय **मदत व पुनर्वसन मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) राळेगाव (जि.अमरावती) येथील तालुका कृषी अधिका-याने आत्महत्याग्रस्त भागातील शेतक-यांचे मनोबल वाढविण्यासाठी घ्यावयाच्या शेतकरी मार्गदर्शन शिबिरासाठीचा निधी दिनांक ३१ मार्च, २०१६ रोजी स्थानिक कर्मचा-यांच्या वैद्यकीय विभागावर वर्ग केला आणि मार्गदर्शन शिबीर न घेता या निधीचा अपहार केला अशी तक्रार सदर लोकप्रतिनिधींनी मा. मंत्री कृषी यांचेकडे दिनांक ९ डिसेंबर, २०१६ रोजी वा त्यासुमारास केली, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, या प्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय,
(३) असल्यास, तदनुसार सदर निधीचा अपहार करणा-या अधिकारी व कर्मचा-यांवर शासनाने कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे,
(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. चंद्रकांत पाटील (०६-०७-२०१८) :** (१) होय.
(२) व (३) एप्रिल ते जून, २०१६ यादरम्यान खरीप हंगामाची तयारी, जलयुक्त शिवार व इतर योजनांच्या कामामुळे ऑगस्ट व सप्टेंबर, २०१६ मध्ये ५ प्रशिक्षण शिबीरे घेण्यात आली. चार महिन्यानंतर प्रशिक्षणाचा कार्यक्रम राबविल्यामुळे संबंधित मंडळ कृषी अधिकाऱ्यास ताकीद देण्यात आली आहे.
(४) प्रश्न उद्‌भवत नाही.

---

## भागाडी लघु प्रकल्प (ता.चांदूर बाजार, जि.अमरावती) येथे पर्यटन विकासासाठी तातडीने निधी उपलब्ध करून देण्याबाबत

**(९) ८२९३५ (१५-०४-२०१७). श्री.ओमप्रकाश ऊर्फ बच्चू कडू (अचलपूर) :** सन्माननीय **पर्यटन मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) भागाडी लघु प्रकल्प (ता.चांदूर बाजार, जि.अमरावती) येथे पर्यटन विकास करण्याचा प्रस्ताव शासनाकडे प्रलंबित आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, पुरेशा निधी अभावी येथील पर्यटन विकासाचे काम सुरु झालेली नाही तसेच पर्यटन विकासासाठी शासनाने तातडीने २ कोटींचा निधी उपलब्ध करून द्यावा अशी मागणी लोकप्रतिनिधींनी मा. मुख्यमंत्री यांचेकडे दिनांक ५ डिसेंबर,२०१६ रोजी वा त्यासुमारास केली, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, सदर मागणीनुसार पर्यटन विकासासाठी निधी देण्याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(४) नसल्यास,विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. जयकुमार रावल (२९-०६-२०१८) :** (१) नाही.
(२) व (३) मा.स्थानिक लोकप्रतिनिधींचे दि.५/१२/२०१६चे(दि.९/१/२०१७)निवेदन प्राप्त झाले आहे.

पर्यटन व सांस्कृतिक कार्य विभाग शासन निर्णय, क्र.बैठक-२०१७/१०/प्र.क्र. ९६७/ पर्यटन, दि.६/२/२०१८ अन्वये भागडी लघु प्रकल्पाच्या विकास कामांसाठी रू.१६४.७५ लक्षच्या रकमेस प्रशासकीय मान्यता देऊन रू.२० लक्ष निधी वितरीत केला आहे.
(४) प्रश्न उद्भवत नाही.

---

**भातसा नदीत होणारा पाण्याचा विसर्ग कमी केल्यामुळे भातसा नदीची पातळी कमी होवून आसनगांव-सावरोली या गावांत पाणी टंचाई निर्माण झाल्याबाबत**

**(१०) ९८६७८ (२६-१२-२०१७). श्री.शांताराम मोरे (भिवंडी ग्रामीण) :** सन्माननीय **जलसंपदा मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) भातसा धरण (जि.ठाणे) विभागाने धरणातून भातसा नदीत होणारा पाण्याचा विसर्ग कमी केल्यामुळे भातसा नदीची पातळी कमी झाली असल्याने आसनगांव-सावरोली या गावांत माहे सप्टेंबर,२०१७ मध्ये वा त्यादरम्यान पाणी टंचाई निर्माण झाली असल्याचे आसनगांव ग्रामपंचायतीने तहसिलदार शहापूर आणि कार्यकारी अभियंता भातसा धरण (जि.ठाणे) यांना निवेदनाद्वारे कळविले आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, सदर निवेदनानुसार भातसा नदीची शासनाने पाहणी केली आहे काय व त्यात काय आढळून आले,
(३) असल्यास, त्यानुसार या गावांची पाणी टंचाई तात्काळ दूर करण्याबाबत शासनाने कोणती उपाययोजना केली वा करण्यात येत आहे,
(४) नसल्यास,विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. गिरीष महाजन (१९-०६-२०१८) :** (१) होय.

आसनगांव (पूर्व) ग्रामपचांयतीने पाणी टंचाई संदर्भात दि.०७/०९/२०१७ रोजी कार्यकारी अभियंता, भातसा धरण व्यवस्थापन विभाग, भातसानगर यांना निवेदन सादर केले आहे.

(२) होय.

क्षेत्रिय अधिकाऱ्यांनी प्रत्यक्ष पाहणी केली असता आसनगांव ग्रामपंचायतीने भातसा नदी काठावरील पाणी उपसा करण्यासाठी पंप उपसा विहीरीमध्ये सर्वसाधारण भूजल पाणीपातळी पेक्षा वरच्या पातळीवर बसविण्यात आल्याचे निदर्शनास आले आहे. त्यामुळे मुंबई महानगरपालिकेची व ठाणे महानगरपालिकेची पाणी पुरवठा मागणी नसल्यास नदीतील पाण्याची पातळी कमी झाल्यास आसनगांव ग्रामपंचायतीस पाणी तुटवडा निर्माण होवू शकतो.

(३) पाणी टंचाई दूर करण्यासाठी भातसा धरण व्यवस्थापन विभाग, भातसानगर विभागांतर्गत उपविभागीय अभियंता, भातसा डावा कालवा उपविभाग, शहापूर यांनी आसनगांव ग्रामपचांयतीस दि.२९/०१/२०१८ रोजी पत्राद्वारे पाणी पुरवठा विहीरीत पाणी उपसा पंप योग्य तलांकापर्यंत बसविण्याबाबत अवगत केलेले आहे.

(४) प्रश्न उद्भवत नाही.

---

## जिल्हाधिकारी, अकोला यांनी शासकीय गाडी शासनालाच भाड्याने दिल्याबाबत

**(११) ९९००२ (२२-१२-२०१७). श्री.रणधीर सावरकर (अकोला पूर्व) :** सन्माननीय **मदत व पुनर्वसन मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) जिल्हाधिकारी, अकोला यांनी सन २०१४-२०१५ या कालावधीतील बाधित शेतकऱ्यांना अर्थसहाय्य करण्यासाठी शासनाने उपलब्ध करून दिलेल्या निधी मधून १२ लक्ष ४१ हजार रुपयाची MH-३०/H-५३२ क्रमांकाची टाटा सफारी गाडी खरेदी केली, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, शासनाच्या मालकीची सदर गाडी जिल्हाधिकारी यांनी दिनांक १ जुलै, २०१५ पासून पूर्वलक्षीप्रभावाने करारनामा करून ३६ हजार रुपये प्रतीमहा दराने भाड्याने शासनालाच दिली, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, सदर वाहन शासकीय प्रयोजनासाठी न वापरता जिल्हाधिकारी यांनी खासगी कामासाठी तसेच जिल्ह्याबाहेर व राज्याबाहेर वापरले असल्याचे निदर्शनास आले आहे, हे ही खरे आहे काय,

(४) असल्यास, याबाबत शासनाने चौकशी केली आहे काय,

(५) असल्यास, चौकशीचे निष्कर्ष काय आहे व त्यानुसार दोषींवर शासनाने कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे,

(६) नसल्यास, विलंबाची करणे काय आहे ?

**श्री. चंद्रकांत पाटील (१०-०७-२०१८) :** (१) हे खरे नाही.

वर्ष २०१४ खरीप हंगामामध्ये अपुऱ्या पावसामुळे जिल्हयातील सर्व प्रकारच्या पिकांचे नुकसान झालेले होते. अवर्षणामूळे बाधितांना मदत देण्यासाठी विभागीय आयुक्त, अमरावती यांचेमार्फत एकुण रुपये १५०.१८ कोटी इतका निधी प्राप्त झाला होता. सदर प्राप्त निधीमधून प्रत्यक्ष बाधित शेतकऱ्यांना रु.१२९.२७ कोटी इतका निधी वाटप करण्यात आला होता. शासननिर्णयामध्ये प्रत्यक्ष बाधित शेतकऱ्यांना वाटप केलेल्या निधीपैकी ०.५ टक्के पर्यंत निधी

हा प्रशासकीय खर्चासाठी देय असल्याचे नमूद होते. त्यापैकी ०.१ टक्के इतका निधी जिल्हास्तरावर प्रशासकीय खर्चासाठी देय होता. सदर प्रशासकीय खर्चातून MH ३० H ५३२ क्रमांकाचे टाटा सफारी हे वाहन खरेदी करण्यात आलेले आहे.

(२) अंशत: खरे आहे.

सरदहू वाहन दि.०७/०४/२०१५ रोजी खरेदी करण्यात आलेले आहे. उपरोक्त वाहन पुढील दुरुस्ती व देखभालीसाठी जिल्हा सेतू समिती, अकोला याचेकडे वर्ग करण्यात आले आहे. तसेच उपरोक्त वाहन उप जिल्हाधिकारी रोजगार हमी योजना, अकोला यांना दिनांक ०१/०७/२०१५ पासून प्रतिदीन रु.१२००/- याप्रमाणे भाडेतत्वावर देण्यात आलेले आहे. याबाबतचा करारनामा दिनांक २४/१२/२०१५ रोजी करण्यात आला आहे.

(३) सदर वाहन खाजगी कामासाठी वापरण्यात आले आहे, हे खरे नाही. सदरहू वाहन भाडे करारावर वर रो.ह.यो. शाखा अकोला यांचेसाठी घेतले असले तरी सदर वाहन तत्कालीन जिल्हाधिकारी, अकोला यांचे अधिनस्त होते. सदर वाहनाचा उपयोग शासकीय कामाकरीता करण्यात आला आहे. तसेच सदर वाहन खाजगी कामाकरीता न वापरता तत्कालीन जिल्हाधिकारी यांचे हैद्राबाद येथील शासन निर्देशाप्रमाणे आयोजित केलेल्या प्रशिक्षणाकरीता जाण्या-करीता वापरण्यात आले आहे.

(४), (५) व (६) जिल्हाधिकारी, अकोला यांनी त्यांच्या दिनांक २२/०६/२०१७ रोजीच्या आदेशान्वये Tata Safari Storme VX-४ वाहन क्र. MH ३० H ५३२ उपजिल्हाधिकारी, रो.ह.यो. यांचेकडे हस्तांतरीत केले आहे.

---

## हुपरी ते सिल्वर झोनकडे (ता.हातकणंगले,जि.कोल्हापूर) जाणाऱ्या रस्त्यांची रुंदी वाढवून सरंक्षक कठडे बांधण्याबाबत

**(१२) १००८०१ (०४-०१-२०१८). डॉ.सुजित मिणचेकर (हातकणंगले) :** सन्माननीय **ग्रामविकास मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) हुपरी ते सिल्वर झोनकडे (ता.हातकणंगले, जि.कोल्हापर) जाणारा रस्ता अरुंद व उंचीवर असल्यामुळे वाहन थेट कालव्यात जाण्याचा धोका निर्माण झाला असल्याने सदर रस्त्यांची रुंदी वाढविण्याची तसेच संरक्षक कठडे बांधण्याची मागणी स्थानिकांनी केली आहे, हे ही खरे आहे काय,

(२) असल्यास, सदर मागणीनुसार शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्रीमती पंकजा मुंडे (०५-०७-२०१८) :** (१) हुपरी ते सिल्वर झोनकडे जाणारा रस्ता अरुंद व उंचीवर आहे ही वस्तुस्थिती आहे. परंतु उपविभागीय अधिकारी दुधगंगा कालवा क्र. २ यांचे कडून कालव्याजवळ तात्पुरते संरक्षक कठडे बांधण्यात आले असल्यामुळे वाहन थेट कालव्यात जाण्याचा प्रश्न उद्भवत नाही.

(२) प्रश्नांकित रस्त्याचे नाव तळदगे ते यळगुड असे असून हा रस्ता ग्रामीण मार्ग क्र.४४ आहे. या रस्त्याची एकूण लांबी ५.०० कि.मी. आहे. त्यापैकी ०/०० ते ४/०० कि.मी. लांबी पंचतारांकित एम.आय.डी.सी.तून जात असून त्याची देखभाल व दुरुस्ती त्यांच्याकडूनच केली जाते.

कि.मी.४/०० येथे दुधगंगा प्रकल्पाचा प्रस्तावित कालवा रस्त्याला छेदत असल्याने या रस्त्याची रुंदी वाढविण्याचे काम तसेच कायम स्वरुपी कठडे बांधणे ही कामे दुधगंगा प्रकल्प उजवा कालवा, कोल्हापूर यांच्याकडून होणे आवश्यक आहे. याबाबत जिल्हा परिषदेने जलसंपदा विभागाला कळविले आहे.
(३) प्रश्न उद्भवत नाही.

---

**नांदेड जिल्ह्यात रोजगार हमी योजनेची कामे बंद असल्याबाबत**

**(१३) १०१३५१ (२६-१२-२०१७). श्री.डी.पी.सावंत (नांदेड उत्तर), श्रीमती अमिता चव्हाण (भोकर) :** सन्माननीय **रोजगार हमी मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) नांदेड जिल्ह्यात गेल्या वर्षीपासून रोजगार हमी योजनेची कामे बंद असल्यामुळे बेरोजगारांचे स्तलांतर होत असल्याची बाब निदर्शनास आली आहे, हे खरे आहे काय,
(२) तसेच जिल्हाधिकारी यांना दिनांक १२ सप्टेंबर रोजी बेरोजगाराकडून कामे सुरु करण्याबाबत निवेदन देऊनही आज पर्यंत कामे चालू झाली नसल्याची बाब निदर्शनास आली आहे,हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, याबाबत शासनाने चौकशी केली आहे काय व चौकशीनुसार शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. जयकुमार रावल (२८-०६-२०१८) :** (१) हे खरे नाही.
नांदेड जिल्ह्यात महात्मा गांधी राष्ट्रीय ग्रामीण रोजगार हमी योजने अंतर्गत मजुरांच्या मागणीनुसार एप्रिल २०१७ ते सप्टेंबर २०१७ पर्यंत ५७५६ सरासरी कामे पुरविण्यात आलेली असुन सरासरी ५४५६९ मजुरांना रोजगार पुरवण्यात आला असुन १२ लाख मनुष्य दिन निर्माण झाले आहेत.
(२) प्राप्त निवेदनानुसार मजुरांना काम उपलब्ध करून देणेबाबत जिल्ह्यातील सर्व तहसिलदार व गटविकास अधिकारी यांना निर्देश दिलेले आहेत. जिल्ह्यात मजुरांच्या मागणीनुसार मजुरांना कामे उपलब्ध करून दिलेली आहेत.
(३) व (४) प्रश्न उद्भवत नाही.

---

**दौंड (जि.पुणे) तालुक्यातील वरवंड, केडगाव, पारगाव, देलवडी व राहू इत्यादी गावांचा समावेश पर्यटन स्थळांतर्गत करण्याबाबत**

**(१४) १०१८९७ (२६-१२-२०१७). श्री.राहूल कुल (दौंड), श्री.संग्राम थोपटे (भोर), श्री.शरददादा सोनावणे (जुन्नर) :** सन्माननीय **पर्यटन मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) दौंड (जि.पुणे) तालुक्यातील वरवंड, केडगाव, पारगाव, देलवडी व राहू इत्यादी गावांचा समावेश पर्यटन स्थळातंर्गत करणेबाबत लोकप्रतिनिधींनी माहे मार्च, २०१७ मध्ये वा त्यादरम्यान मागणी केली आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास,याबाबतचा सविस्तर प्रस्ताव सहसंचालक पर्यटन व सांस्कृतिक कार्य यांचेकडे माहे जून- जुलै, २०१७ मध्ये वा त्यादरम्यान दाखल करण्यात आला आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास,सदर मागणीनुसार उक्त गावांचा समावेश पर्यटन स्थळातंर्गत करण्यासह त्यास आवश्यक निधी उपलब्ध करून देण्याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. जयकुमार रावल (२९-०६-२०१८) :** (१) होय. मा.लोकप्रतिनिधींचे दि.३०/३/२०१७ चे निवेदन प्राप्त झाले आहे.

(२) होय.

(३) पर्यटन व सांस्कृतिक कार्य विभाग शासन निर्णय, क्र.बैठक-२०१७/१०/प्र.क्र.९६७/ पर्यटन, दि.६/२/२०१८ अन्वये दौंड तालुक्यात (१) वरवंड गोपीनाथ, (२) पारगाव भीमा नदी परिसर, (३) देलवडी खंडोबा मंदिर व (४) मुळा मुठा संगम परिसर या चार ठिकाणच्या विकास कामांसाठी अनुक्रमे रू.१२४.९५ लक्ष, २४८.९० लक्ष,रू.१२४.७२ लक्ष व रू.१७२.२५ लक्षच्या कामांना प्रशासकीय मान्यता देऊन अनुक्रमे रू.२५ लक्ष, रू.३० लक्ष, रू.२५ लक्ष व रू.२५ लक्ष निधी वितरीत करण्यात आला आहे व केडगाव येथील राज्य पर्यटन विकास समितीने अमान्य केला आहे.

(४) प्रश्न उद्भवत नाही.

---

**पुर्ये तर्फे देवळे (बौध्दवाडी) (ता.संगमेश्वर,जि.रत्नागिरी) येथे नवीन कॉजवे बांधण्याबाबत**

**(१५) १०२०४५ (०४-०१-२०१८). श्री.सदानंद चव्हाण (चिपळूण) :** सन्माननीय **ग्रामविकास मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) पुर्ये तर्फे देवळे (बौध्दवाडी) (ता.संगमेश्वर,जि.रत्नागिरी) येथील कॉजवे मुसळधार पावसामुळे वाहून गेल्याची घटना दिनांक १५ सप्टेबर, २०१७ रोजी वा त्यासुमारास निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, सदर कालवे वाहून गेल्याने या भागाचा संपर्क तुटला असल्याने त्याठिकाणी नवीन कॉजवेचे बांधकाम करण्याबाबत मागणी होत आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, सदर मागणीनुसार नवीन कॉजवेचे बांधकाम करण्याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्रीमती पंकजा मुंडे (०५-०७-२०१८) :** (१) व (२) प्रश्नांकित कॉजवेचा भराव वाहून गेला असून सदर वाडीचा कॉजवेवरुन येणे जाणेचा संपर्क तुटला असल्याने कॉजवे दुरुस्तीची मागणी तेथील ग्रामस्थांनी मौखिक स्वरुपात केली आहे.
(३) पुर्ये तर्फे देवळे बौध्दवाडी या ग्रामीण मार्ग क्र ३२२ या रस्त्याचे व त्यावरील कालवेच्या दुरुस्तीचे काम सन २०१७-१८ च्या अतिवृष्टी कार्यक्रमात प्रस्तावित करण्यात आले असून प्रस्ताव जिल्हा नियोजन समिती, रत्नागिरीकडे जिल्हा परिषदेमार्फत पाठविण्यात आला आहे.
(४) प्रश्न उद्भवत नाही.

---

**यवतमाळ जिल्हयातील महाराष्ट्र औद्योगिक विकास महामंडळ, उरमखेड मध्ये पाटबंधारे विभागांतर्गत अंम्बाना तलावात औद्योगिक पाणी साठा आरक्षित करण्याबाबत**

**(१६) १०२११३ (०२-०१-२०१८). श्री.राजेंद्र नजरधने (उमरखेड) :** सन्माननीय **जलसंपदा मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) यवतमाळ जिल्हयातील महाराष्ट्र औद्योगिक विकास महामंडळ, उरमखेड मध्ये उद्योजकांना पाणी उपलब्ध नसल्यामुळे पाटबंधारे विभागांतर्गत अंम्बाना तलावात औद्योगिक पाणी साठा आरक्षित करण्याबाबत माहे जुलै, २०१७ रोजीपासून स्थानिक लोकप्रतिनिधीनी मा.जलसंपदा मंत्री यांना लेखी निवेदनाद्वारे विनंती केली आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, या निवेदनानुसार शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. गिरीष महाजन (२१-०६-२०१८) :** (१) होय.
(२) सिंचनानंतर तलावातील शिल्लक पाणीसाठा गत तीन ते चार वर्षाचा अगदी नगण्य आहे. तसेच जिल्हाचे पाणी आरक्षण समिती तर्फे सुध्दा पाणी आरक्षण करण्यात आलेले नाही. महाराष्ट्र औद्द्योगिक विकास महामंडळाकडून मागणी प्राप्त झाल्यास पाणी आरक्षण प्रस्ताव सादर करण्यात येईल.
(३) प्रश्न उद्भवत नाही.

---

**कोल्हापूर जिल्हयात शासकीय, अशासकीय सदस्यांची जिल्हा पर्यटन समिती स्थापन करण्याबाबत**

**(१७) १०२७५६ (०१-०१-२०१८). डॉ.सुजित मिणचेकर (हातकणंगले) :** सन्माननीय **पर्यटन मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) कोल्हापूर जिल्हयात शासकीय, अशासकीय सदस्यांची जिल्हा पर्यटन समिती अजूनही अस्तित्वात आलेली नाही, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, अद्यापपर्यंत ही समिती स्थापन न करण्याची कारणे काय आहेत,
(३) असल्यास, सदर समिती केव्हापर्यंत स्थापन करण्यात येणार असून यात कोणाकोणाचा समावेश करण्यात येणार आहे ?

**श्री. जयकुमार रावल (२९-०६-२०१८) :** (१), (२) व (३) जिल्हास्तरावर पर्यटन स्थळांची निवड करणे, प्रस्ताव तयार करणे आणि त्यांची अंमलबजावणी करणे तसेच या कामांचा सातत्याने आढावा घेणे यासाठी शासन निर्णय, पर्यटन व सांस्कृतिक कार्य विभाग क्र.टीडीएस-२०१८/८/प्र.क्र.४६३/पर्यटन, दि.४/११/२०१० अन्वये जिल्हाधिकारी यांच्या अध्यक्षतेखाली सरकारी अधिकाऱ्यांचा समावेश असलेली समिती स्थापन करण्यात आलेली आहे.

स्थानिक पातळीवरील पर्यटन क्षेत्रातील सहभागीदार(स्टेक होल्डर), टूर ऑपरेटर्स, हॉटेल संघटना,पर्यटन क्षेत्रातील उद्योजक,वास्तुविशारद, इतिहास तज्ञ, प्रसार माध्यमातील अनुभवी व ज्येष्ठ मान्यवर तज्ञ आदी यांना आवश्यकतेनुसार या समितीच्या बैठकीकरिता जिल्हाधिकारी मार्गदर्शनाकरिता आमंत्रित करु शकतील अशी तरतूद आहे.

---

**राज्यातील २५ टक्के अंगणवाडी सेविकांना गेल्या ६ महिन्यापासून मानधन मिळाले नसल्याबाबत**

**(१८) १०५१८० (०७-०४-२०१८). श्री.भास्कर जाधव (गुहागर), श्री.संजय पोतनीस (कलिना), श्री.संदीप नाईक (ऐरोली), श्री.शशिकांत शिंदे (कोरेगाव), श्री.जितेंद्र आव्हाड (मुंब्रा कळवा), श्री.वैभव पिचड (अकोले), श्री.राहुल जगताप (श्रीगोंदा), श्री.पांडुरंग बरोरा (शहापूर), श्री.पंकज भुजबळ (नांदगाव), श्री.जयंत पाटील (इस्लामपूर), श्री.सुरेश लाड (कर्जत), श्री.हसन मुश्रीफ (कागल), श्री.दत्तात्रय भरणे (इंदापूर), श्री.दिपक चव्हाण (फलटण), श्रीमती सुमन पाटील (तासगाव - कवठेमहांकाळ), श्रीमती संध्यादेवी देसाई-कुपेकर (चंदगड), श्री.शामराव ऊर्फ बाळासाहेब पाटील (कराड उत्तर), श्री.विजय भांबळे (जिंतूर), श्री.जयदत्त क्षीरसागर (बीड), श्री.मकरंद जाधव-पाटील (वाई), डॉ.सतीश (अण्णासाहेब) पाटील (एरंडोल), श्री.हनुमंत डोळस (माळशिरस), श्री.राणाजगजीतसिंह पाटील (उस्मानाबाद), श्रीमती दिपिका चव्हाण (बागलाण), श्री.संदीपानराव भुमरे (पैठण), डॉ.भारती लव्हेकर (वर्सोवा), श्री.शिरीषदादा चौधरी (अमळनेर), श्री.ओमप्रकाश ऊर्फ बच्चू कडू (अचलपूर), श्री.चंद्रकांत सोनवणे (चोपडा), श्री.सदानंद चव्हाण (चिपळूण), श्री.संजय कदम (दापोली), कुमारी प्रणिती शिंदे (सोलापूर शहर मध्य), श्री.अजित पवार (बारामती), श्री.दिलीप वळसे-पाटील (आंबेगाव), श्री.राजेश टोपे (घनसावंगी), श्री.प्रदीप नाईक (किनवट) :** सन्माननीय **महिला व बालविकास मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) राज्यातील २५ टक्के अंगणवाडी सेविकांना गेल्या ६ महिन्यापासून मानधन मिळाले नसल्याचे माहे जानेवारी २०१८ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, गेली ६ महिन्यापासून मानधन मिळत नसल्याने जिंतूर (जि.हिंगोली) तालुक्यातील अंगणवाडी सेविकेने माहे नोव्हेंबर २०१७ मध्ये वा त्यादरम्यान गळफास घेऊन आत्महत्त्या केली, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, याप्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय व चौकशीत काय आढळून आले,

(४) असल्यास, राज्यातील अंगणवाडी सेविकांना मानधन देण्याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्रीमती पंकजा मुंडे (१९-०६-२०१८) :** (१) हे खरे आहे.

(२) होय, हे खरे आहे.

पोलीस उप निरिक्षक पोलीस स्टेशन बोरी, ता.जिंतूर यांचे पत्र क्र.१४१७ दिनांक १८/११/२०१७ नुसार मयत सुमित्रा राखुंडे यांच्या राहत्या घरी संबंधिताने मृत्यूपूर्वी लिहिलेली चिठ्ठी पोलिसांनी ताब्यात घेतली आहे. सदर चिठ्ठीमध्ये संबंधिताने सन २००८ पासूनचे रजिस्टर कोठून द्यायचे, माहे जून, २०१७ पासून मानधन मिळाले नाही, लेक काही पैसे देत नाही, तसेच सुना जावा बरोबर नीट रहात नाहीत म्हणून मी दु:खी आहे. माझे आई वडीलांना फार दु:ख होईल असे नमूद आहे.

(३) सदर प्रकरणात आत्महत्येचा गुन्हा दाखल असून पोलीसांकडून चौकशी सुरु आहे. त्यांचेकडून अंतिम अहवाल प्राप्त झालेला नाही.

(४) ज्या अंगणवाडी सेविका व मदतनीस यांची PFMS प्रणालीमध्ये नोंद झालेली आहे त्यांचे माहे डिसेंबर, २०१७ पर्यंतचे मानधन आयुक्तालय स्तरावरुन अदा करण्यात आलेले आहे. ज्या अंगणवाडी सेविका व मदतनीस यांची PFMS प्रणालीमध्ये नोंदणी काही तांत्रिक अडचणीमुळे होऊ शकली नाही त्या अंगणवाडी सेविका व मदतनीस त्यांचे मानधन जुन्या पध्दतीने अदा करण्यास शासन निर्णय दिनांक १७ नोव्हेंबर, २०१७ नुसार मान्यता दिलेली असून अंगणवाडी सेविका व मदतनीस यांच्या खात्यावर माहे डिसेंबर, २०१७ पर्यंतचे मानधन अदा करण्यात आलेले आहे.

(५) प्रश्न उद्भवत नाही.

---

## खडकपूर्णा प्रकल्पांतर्गत (जि.बुलढाणा) असलेल्या अंचरवाडी वितरिकेचे अपूर्ण काम पूर्ण करण्याबाबत

**(१९) १०६७५१ (१३-०४-२०१८). डॉ.शशिकांत खेडेकर (सिंदखेड राजा) :** सन्माननीय **जलसंपदा मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) खडकपूर्णा प्रकल्पांतर्गत (जि.बुलढाणा) असलेल्या अंचरवाडी वितरिकेचे अपूर्ण काम येत्या १५ दिवसांच्या आत पूर्ण करुन वितरिकेचे पाणी सोडून चाचणी घेण्यात यावी अशी मागणी मान्य न केल्यास दिनांक २ जानेवारी, २०१८ रोजीपासून उपोषण करण्याचा इशारा तेथील शेतक-यांनी दिनांक २३ डिसेंबर, २०१७ रोजी वा त्यासुमारास खडकपूर्णा प्रकल्पाच्या कार्यकारी अभियंत्याना दिला आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, या मागणीनुसार शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. गिरीष महाजन (१९-०६-२०१८) :** (१) होय.
(२) मौजे मिसाळवाडी शिवारातील पाच ठिकाणी गटबदल, एकत्रीकरण, ताबा अशा विविध अडचणींमुळे ९ भूधारकांच्या भूसंपादनाचा अंतिम निवाडा होवूनही मोबदला अदा होऊ न शकल्याने वितरीकेचे काम पूर्ण करता येत नाही. आता ५ भूधारकांचा मोबदला वाटप झालेला असून ४ भूधारकांचा मोबदला वाटप करण्याची कार्यवाही सुरू आहे.

प्रकल्पाचे अधीक्षक अभियंता व कार्यकारी अभियंता यांनी भूसंपादन अडचणींचे निराकारण करून व प्रक्षेत्री प्रत्यक्ष भेट देऊन कामाची गती वाढविण्याबाबत कंत्राटदारास निर्देशीत करण्यात आलेले आहे.
(३) प्रश्न उद्भवत नाही.

---

**अमरावती जिल्हयात गेल्या सहा महिन्यापासून राष्ट्रीय रोजगार हमी योजनेमधील मंजूरांना मजुरी मिळत नसल्याबाबत**

**(२०) १०७१४२ (०७-०४-२०१८). श्री.वैभव पिचड (अकोले), श्री.अजित पवार (बारामती), श्री.राहुल जगताप (श्रीगोंदा), श्री.दत्तात्रय भरणे (इंदापूर), श्री.जितेंद्र आव्हाड (मुंब्रा कळवा), श्री.पांडुरंग बरोरा (शहापूर) :** सन्माननीय **रोजगार हमी मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) अमरावती जिल्हयात गेल्या सहा महिन्यापासून राष्ट्रीय रोजगार हमी योजनेमधील विविध योजनांचा लाभ घेणाऱ्या मजुरांना मजुरी मिळालेली नाही, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, याबाबत शासनाने चौकशी केली आहे काय व त्यात काय आढळून आले,
(३) असल्यास, त्यानुसार सदर योजनेमध्ये विविध कामे करणाऱ्या मजुरांना मजुरी मिळण्याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. जयकुमार रावल (३०-०६-२०१८) :** (१) हे खरे नाही.
(२) प्रश्न उद्भवत नाही.
(३) मजूरांना मजुरी वेळेवर मिळण्याकरिता जिल्हा स्तरावरुन तालुका स्तरावरील तहसील कार्यालय पंचायत समिती कार्यालय व इतर यंत्रणा यांचेसोबत दररोज संपर्क करुन प्रदाने थकीत राहणार नाही याबाबत त्यांना सूचित करण्यात आले आहे. मजूरांच्या मजूरीची प्रदाने वेळेच्या आत पूर्ण करण्याची दक्षता घेण्यात येते.
(४) प्रश्न उद्भवत नाही.

---

**ओबीसी संवर्गातील विद्यार्थ्यांना मॅट्रिकेत्तर शिष्यवृत्तीना अनुदान देण्याबाबत**

**(२१) १०८६३३ (०७-०४-२०१८). श्री.सुधाकर देशमुख (नागपूर पश्चिम), श्री.सुभाष साबणे (देगलूर), श्री.बळीराम सिरसकार (बाळापूर) :** सन्माननीय **विमुक्त जाती/भटक्या जमाती व इतर मागासवर्ग आणि विशेष मागास प्रवर्ग कल्याण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) केंद्र शासनाकडून मागासवर्गीय (ओबीसी) विद्यार्थ्यांना सन २०१६-१७ व २०१७-१८ या दोन वर्षांची ९०० कोटी रूपयाची शिष्यवृत्ती मिळाली नसल्यामुळे त्यांना शिक्षणापासुन वंचीत राहावे लागत असल्याबाबतची बाब माहे डिसेंबर, २०१७ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आलेली आहेत, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, राज्यातील ओबीसी, एसबीसी, व्हीजेएनटी या संवर्गातील विद्यार्थ्यांना मॅट्रिकेत्त्तर षिश्यवृत्ती वार्शिक ४४,५००/- रूपये असल्याची २००७-२००८ पर्यंत केंद्र सरकारकडे नोंद असुन तत्कालीन मुख्यमंत्रीनी वार्षिक उत्पन्न मर्यादा ४४,५००/- वरून एक लक्ष इतकी केलेली होती, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, केंद्र सरकारने ओबीसी संवर्गाकरीता विद्यार्थ्यांना मॅट्रिकेत्त्तर शिष्यवृती वार्षिक ४४,५००/- रूपये वरून १ लक्ष दि. ११ आॅगस्ट २०११ पासुन लागु केल्यामुळे विद्यार्थ्यांना सन २०१६-१७ व २०१७-१८ या दोन वर्षाच्या ९०० कोटी रूपयाच्या शिष्यवृत्त्तीपासुन वंचीत राहावे लागत आहे,हे ही खरे आहे काय,

(४) असल्यास, ओबीसी संवर्गातील विद्यार्थ्यांना मॅट्रिकेत्तर शिष्यवृत्तीच्या अनुदानापासुन वंचीत राहावे लागणार नाहीत त्याकरीता सन २०१६-१७ व २०१७-१८ मध्ये ९०० कोटी रूपयाचे अनुदान मिळवुन देण्यात येणार आहेत काय,

(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**प्रा. राम शिंदे (१६-०७-२०१८) :** (१), (२), (३) व (४) शासन निर्णय दि.२१.१.२००८ अन्वये इतर मागासवर्गीयांसाठी भारत सरकारची मॅट्रीकोत्तर शिष्यवृत्ती योजनेचा लाभ घेणाऱ्या विद्यार्थ्यांच्या पालकांची उत्पन्न मर्यादा रु.६५,२९०/- वरुन रु.१,००,०००/- इतकी करण्यास मान्यता देण्यात आली आहे.

इतर मागास प्रवर्गातील विद्यार्थ्यांना भारत सरकार मॅट्रीकोत्तर शिष्यवृत्ती योजनेमध्ये केंद्र शासनाने दि.११.८.२०११ च्या कार्यालयीन आदेशान्वये बदल केला आहे. त्यानुसार केंद्र शासनाने ही योजना दि.१.७.२०११ पासून मर्यादित निधी (fund limited) तसेच (Merit based) स्वरुपाची केली असल्याने ठराविक मर्यादेपर्यंत निधी केंद्र शासनाकडून उपलब्ध करुन देण्यात येतो. केंद्र शासनाचा (fund limited) आहे. त्यामुळे या योजने अंतर्गत लाभार्थी वंचित राहू नये म्हणून केंद्र शासनाकडून मिळत असलेल्या निधी पेक्षा अधिकचा खर्च राज्य शासनाने या योजनेवर केलेला आहे.

(५) प्रश्न उद्भवत नाही.

---

**भंडारा जिल्हयातील इतर जिल्हा मार्ग व ग्रामिण मार्ग दुरूस्तीसाठी निधी उपलब्ध करून देण्याबाबत**

**(२२) १०८७२५ (२८-०३-२०१८). श्री.रामचंद्र अवसरे (भंडारा) :** सन्माननीय **ग्रामविकास मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) भंडारा जिल्हयातील जवळपास ६० ते ७० टक्के इतर जिल्हा मार्ग व ग्रामिण मार्गाच्या देखभाल व दुरूस्तीसाठी गेल्या तीन वर्षात पुरेसा निधी न मिळाल्याने रस्त्याची दुरवस्था झाली आहे, त्यामुळे सन २०१७-१८ या आर्थिक वर्षात कार्यकारी अभियंता जि.प. भंडारा अंतर्गत सुमारे ५ हजार कि.मी. रस्ते दुरूस्तीसाठी अंदाजे १९० कोटी रूपयाची मागणी माहे ऑगस्ट, २०१७ मध्ये वा त्यादरम्यान केली आहे, हे खरे आहे काय,

(२) तसेच गेल्या तीन वर्षात पुरेसा निधी न मिळाल्याने सन २०१७-१८ या आर्थिक वर्षात भंडारा जिल्हा व भंडारा विधानसभा क्षेत्राकरीता इजिमा व ग्राम रस्त्याच्या नुतनीकरण, खडीकरण व डांबरीकरणाकरीता शासनातर्फे पुरेसा निधी मिळावा अशी मागणी स्थानिक लोकप्रतिनिधींनी दिनांक २३ जानेवारी, २०१८ रोजी वा त्यासुमारास निवेदनाद्वारे केली आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, भंडारा जिल्हा व भंडारा विधानसभा क्षेत्राअंतर्गत खराब झालेल्या रस्त्याच्या दुरूस्तीसाठी अंदाजे १९० कोटीपैकी किमान १०० ते १२० कोटीची तरतुद करण्यात येणार आहे,हे ही खरे आहे काय,

(४) असल्यास, याबाबत शासनाने चौकशी केली आहे काय व त्यानुसार सदर रस्त्याच्या देखभाल व दुरूस्तीसाठी निधी देण्याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्रीमती पंकजा मुंडे (०५-०७-२०१८) :** (१) होय, हे खरे आहे.

(२) अशा प्रकारची मागणी प्राप्त झाल्याचे आढळून येत नाही.

(३) व (४) भंडारा जिल्हा परिषदे अंतर्गत ग्रामीण मार्ग व इतर जिल्हा मार्ग रस्त्यांची एकूण लांबी ४८८६.९३ कि.मी. इतकी असून अस्तित्वातील लांबी ३९३०.०० कि.मी इतकी आहे.

सदर रस्त्यांच्या दुरुस्तीसाठी शासनाकडे उपलब्ध असलेल्या निधीचे वाटप रस्त्यांच्या लांबीच्या व मानव विकास निर्देशकाच्या प्रमाणात करण्यात येते .

सन २०१७-१८ या आर्थिक वर्षासाठी भंडारा जिल्हा परिषदेस रस्ते, पुल दुरुस्ती व परीरक्षण या कार्यक्रमांतर्गत रु.५८१.७९ लक्ष तसेच जिल्हा वार्षिक योजनेअंतर्गत रु.१०६८.१३ लक्ष असे एकूण साधारणत: रु.२४.०० कोटी निधी उपलब्ध करुन देण्यात आला आहे.

(५) प्रश्न उद्भवत नाही.

---

**नांदगाव खंडेश्वर (जि.अमरावती) तालुक्यातील रस्ते व पूल दुरुस्ती योजनेत्तर कार्यक्रमातील मंजुर कामे प्रलंबीत असल्याबाबत**

**(२३) १०९२७१ (०६-०४-२०१८). प्रा.विरेंद्र जगताप (धामणगाव रेल्वे), श्री.हर्षवर्धन सपकाळ (बुलढाणा), श्री.अमर काळे (आर्वी), ॲड.यशोमती ठाकूर (तिवसा), श्री.रणजीत कांबळे (देवळी) :** सन्माननीय **ग्रामविकास मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) सन २०१६-१७ मध्ये रस्ते व पूल दुरुस्ती योजनेत्तर कार्यक्रमातील गट (ब) व गट (क) अंतर्गत नांदगाव खंडेश्वर (जि.अमरावती) तालुक्यातील मंजुर कामे अद्याप सुरु न केल्याबाबत लोकप्रतिनिधींनी लेखी कळविले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, याबाबत शासनाने चौकशी केली आहे काय,

(३) असल्यास,त्यानुसार सदर मंजुर कामे सुरु करणेबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्रीमती पंकजा मुंडे (०५-०७-२०१८) :** (१) होय, हे खरे आहे.

(२) व (३) सन २०१६-१७ या आर्थिक वर्षात रस्ते, पुल दुरुस्ती योजनेत्तर कार्यक्रम गट ब व क अंतर्गत नांदगांव खंडेश्वर तालुक्यातील ४ कामांना मंजूरी प्रदान करण्यात आली होती परंतु सदर कामे हि अन्य योजनेतून पूर्ण झाली असल्याने जिल्हा परिषदेच्या विनंतीनुसार सदर ४ कामांऐवजी ३ कामे बदलून देण्यात आली असून ती जिल्हा परिषदेमार्फत पूर्ण करण्यात आलेली आहेत.

(४) प्रश्न उद्भवत नाही.

---

**नाशिक जिल्हयात धाम धरणामुळे विस्थापित होणा-या संपूर्ण प्रकल्पग्रस्तांचे पुनर्वसन करण्याबाबत**

**(२४) १०९५२५ (०१-०४-२०१८). श्रीमती निर्मला गावित (इगतपूरी), श्री.विजय वडेट्टीवार (ब्रम्हपूरी), श्री.अमिन पटेल (मुंबादेवी), श्री.अस्लम शेख (मालाड पश्चिम), श्री.नसीम खान (चांदिवली), श्री.डी.पी.सावंत (नांदेड उत्तर), श्री.बाळासाहेब थोरात (संगमनेर), श्री.भारत भालके (पंढरपूर), श्री.कालीदास कोळंबकर (वडाळा), डॉ.संतोष टारफे (कळमनुरी) :** सन्माननीय **मदत व पुनर्वसन मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) नाशिक जिल्हयात धाम धरणामुळे विस्थापित होणा-या धरणग्रस्तांचे संपूर्ण पुनर्वसन होण्या आधीच या धरणाची घळभरणी करण्याचा शासनाने निर्णय घेतला असल्याचे दिनांक १२ फेब्रुवारी, २०१८ रोजी वा त्यासुमारास निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय

(२) असल्यास, अद्याप ३८ प्रकल्पग्रस्तांच्या कुटूंबाचे पुनर्वसन झालेले नाही, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, आधी पुनर्वसन मग धरण या धोरणानुसार येथील संपूर्ण प्रकल्पग्रस्तांचे या घळ भरणीच्या आधी पुनर्वसन करण्याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली आहे वा करण्यात येत आहे,
(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. चंद्रकांत पाटील (३०-०६-२०१८) :** (१) अद्याप घळभरणी करण्याचा निर्णय घेण्यात आलेला नाही.
(२) मौजे दरेवाडी येथील ३८ प्रकल्पग्रस्तांचे पुनर्वसन पुराणेची टेकडी येथील मंजूर अभिन्यासानुसार पाडण्यात आलेल्या भुखंडाचे सर्व प्रकल्पबाधीतांना त्यांच्या कुटुंबसंख्येनुसार देय क्षेत्रफळाच्या भुखंड वाटपाचे आदेश निर्गमित करण्यात आलेले आहेत.
(३) मौजे भरवज, निरपण, सारूक्तेवाडी व बोरवाडी गावाच्या नविन पुनर्वसित गावठाणात शासनाच्या नियमानुसार देय १८ नागरी सुविधा उपलब्ध करूण देण्यात आल्या आहेत.तर दरेवाडी येथील नागरी सुविधा प्रगतीपथावर असुन सदर नागरी सुविधा तातडीने पुर्ण करण्याचे नियोजन करण्यात आले आहे.
(४) प्रश्न उद्‌भवत नाही.

---

**सोलापूर जिल्हयातील ७४० अंगणवाड्यांसाठी स्वतंत्र इमारतीचे बांधकाम करण्याबाबत**

**(२५) १०९५७० (०४-०४-२०१८). श्री.भारत भालके (पंढरपूर) :** सन्माननीय **महिला व बालविकास मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) सोलापूर जिल्हयातील ७४० अंगणवाड्यांना स्वतंत्र इमारत किंवा खोली नसल्यामुळे, अंगणवाडी शाळा उघड्यावर भरवण्यात येत असल्याचे निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, या बालकांना अंगणवाडी इमारत नसल्यामुळे बाल विद्यार्थ्यांना दिला जाणारा पोषण आहार देखील स्वतंत्र इमारती अभावी मिळणे अशक्य होत असल्याचे निदर्शनास आले आहे, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, याबाबत शासनाने चौकशी करुन कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्रीमती पंकजा मुंडे (१९-०६-२०१८) :** (१) हे खरे नाही.

सोलापूर जिल्हयात एकूण ३२६९ अंगणवाडी मंजूर आहेत. त्यापैकी २५६५ अंगणवाडयांना स्वत:च्या इमारती उपलब्ध आहेत. उर्वरित ७०४ अंगणवाडयांपैकी ५६ अंगणवाडी केंद्राची इमारत बांधकाम सुरु असून ६४८ अंगणवाडयांना स्वत:च्या इमारती उपलब्ध नाहीत. ६४८ स्वतंत्र इमारत किंवा खोली उपलब्ध नसणारी अंगणवाडी केंद्र हे प्राथमिक शाळा खोली, समाजमंदिर, ग्रामपंचायत इमारत, खाजगी जागा व इतर अन्य ठिकाणी भरविण्यात येत असून एकही अंगणवाडी केंद्र उघडयावर भरविले जात नाही.

(२) हे खरे नाही.

सोलापूर जिल्हयातील सर्व अंगणवाडी केंद्र स्वतंत्र इमारत अथवा पर्यायी व्यवस्था केलेल्या इमारतीमध्ये (प्राथमिक शाळा वर्ग खोली, ग्रामपंचायत इमारत, समाजमंदिर, खाजगी जागा व अन्य ठिकाणी) भरविण्यात येत असून बालकांना पोषण आहार निकर्षानुसार देण्यात येत आहे.

(३) जिल्हयातील ज्या अंगणवाडयांना स्वतंत्र इमारत उपलब्ध नाही. त्यासाठी शासकीय जागा उपलब्ध करुन घेण्यासाठी संबंधितांना सूचना देण्यात आल्या आहेत. अशाप्रकारे १५१ अंगणवाडयांना बांधकामासाठी जागा उपलब्ध झाली आहे. तसेच जिल्हा परिषदेच्या प्राथमिक शाळेच्या इमारतीतील खोल्यांमध्ये ३६ अंगणवाडी केंद्र स्थलांतरीत करण्यात आलेली आहेत. महिला व बाल विकास विभाग, शासन निर्णय दिनांक १५ डिसेंबर, २०१७ च्या शासन निर्णयान्वये सन २०१७-१८ पासून जिल्हा वार्षिक योजनेमधून ५०% नविन अंगणवाडी बांधकामासाठी व जुन्या अंगणवाडीत किरकोळ दुरुस्तीसाठी तसेच ज्या अंगणवाडीत शौचालये नाहीत तेथे शौचालये बांधण्यासाठी ५०% प्रमाणे निधीचे प्रावधान करण्यात आलेले आहे.

(४) प्रश्न उद्‌भवत नाही.

---

**महाराष्ट्र औद्योगिक विकास महामंडळ उमरखेडमध्ये (जि.यवतमाळ) उद्योजकांना अम्बोना तलावात औद्योगिक पाणीसाठा आरक्षित करुन देण्याबाबत**

**(२६) ११०५३४ (२८-०३-२०१८). श्री.राजेंद्र नजरधने (उमरखेड) :** सन्माननीय **जलसंपदा मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) महाराष्ट्र औद्योगिक विकास महामंडळ उमरखेडमध्ये (जि.यवतमाळ) उद्योजकांना पाणी उपलब्ध नसल्यामुळे पाटबंधारे विभागांतर्गत अम्बोना तलावात औद्योगिक पाणी साठा आरक्षित करण्याबाबत लोकप्रतिनिधींनी मा.जलसंपदा मंत्री यांना दिनांक १२ जुलै,२०१७ रोजी वा त्यासुमारास लेखी निवेदन दिले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, या निवेदनानुसार शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. गिरीष महाजन (१९-०६-२०१८) :** (१) होय.

(२) महाराष्ट्र औद्दयोगिक विकास महामंडळाकडून मागणी प्राप्त झाल्यास तपासणी करून पाणी आरक्षणाबाबत उचित कार्यवाही करण्यात येईल.

(३) प्रश्न उद्‌भवत नाही.

---

**कासार्डे-बंडवाडी-उत्तर गावठाण (ता.कणकवली, जि.सिंधुदुर्ग) या रस्त्याची झालेली दुरवस्था**

**(२७) ११०७६७ (१२-०४-२०१८). श्री.वैभव नाईक (कुडाळ) :** सन्माननीय **ग्रामविकास मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) कासार्डे-बंडवाडी-उत्तर गावठाण (ता.कणकवली, जि.सिंधुदुर्ग) या रस्त्याची दुरवस्था झाल्याने सदर रस्त्याचे दुरुस्तीकरण व डांबरीकरण करावे अशी मागणी ग्रामस्थांनी जिल्हा परिषदेच्या सार्वजनिक बांधकाम विभागाकडे वारंवार निवेदने देऊन केली आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, सदर रस्त्याची शासनाने पाहणी केली आहे काय व त्यानुसार उक्त रस्त्यांची दुरुस्ती व डांबरीकरण करण्याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(३) नसल्यास,विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्रीमती पंकजा मुंडे (०५-०७-२०१८) :** (१) अशा प्रकारचे निवेदन जिल्हा परिषदेच्या बांधकाम विभागाकडे प्राप्त झाल्याचे आढळून आले नाही.

(२) कासार्डे-बंडवाडी-उत्तर गावठाण हा रस्ता दोन ग्रामीण भागांमध्ये अंतर्भूत आहे.

अ) रा.मा.१७७ ते तरळे दत्तमंदिर चाफर्डेवाडी कासार्डे रस्ता ग्रामीण मार्ग क्र.६५

ब) आनंदनगर जोडरस्ता (कासार्डे) रा.म.मा.क्र.१७ ते कासार्डे बंडवाडी आनंदनगर ते उत्तर गावठण देवूळवाडी ते आयरेवाडी मार्ग ग्रामीण मार्ग क्र. ६४.

ग्रामीण मार्ग क्र. ६५ ची एकूण लांबी २.५०० कि.मी.असून डांबरी पृष्ठभागाची आहे. त्यापैकी सा.क्र. ०/०० ते ०/१५० मधील दुरुस्तीचे काम सन २०१५-१६ मध्ये आमदार स्थानिक विकास योजनेअंतर्गत, सा.क्र. १/८०० ते २/१०० लांबीतील दुरुस्तीचे काम सन २०१६-१७ मध्ये जिल्हा वार्षिक योजनेअंतर्गत तसेच सा.क्र. २/१०० ते २/१८६ लांबीतील रस्ता दुरुस्तीचे काम सन २०१७-१८ मध्ये १४ वा वित्त आयोग मधून पूर्ण करण्यात आले आहे. सा.क्र. ०/१५० ते ०/४०० कि.मी. लांबी सुस्थितीत आहे. उर्वरीत लांबीच्या दुरुस्तीचे काम निधीच्या उपलब्धतेनुसार हाती घेण्याचे जिल्हा परिषदेचे नियोजन आहे.

ग्रामीण मार्ग क्र. ६४ ची एकूण लांबी ५.८०० कि.मी. आहे. त्यापैकी प्रश्नामध्ये १/२०० ते १/८०० कि.मी. लांबी अंतर्भूत असून सदरची लांबी सुस्थितीत आहे.

(३) प्रश्न उद्भवत नाही.

---

**राज्यात शेती, उद्योग आणि घरगुती वापरासाठी जलसंपदा विभागातर्फे पुरविण्यात येणाऱ्या पाण्याचे दर वाढविण्याचा घेतलेला निर्णय**

**(२८) १११२५७ (११-०४-२०१८). श्री.उल्हास पाटील (शिरोळ), श्री.प्रकाश फातर्पेकर (चेंबूर), श्री.संदीपानराव भुमरे (पैठण), श्री.किशोर पाटील (पाचोरा), श्री.सुरेश धानोरकर (वरोरा), श्री.सुनिल राऊत (विक्रोळी), श्री.योगेश (बापू) घोलप (देवळाली), डॉ.राहूल पाटील (परभणी) :** सन्माननीय **जलसंपदा मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) राज्यात शेती, उद्योग आणि घरगुती वापरासाठी जलसंपदा विभामातर्फे पुरविण्यात येणाऱ्या पाण्याचे दर १ फेब्रुवारी, २०१८ पासून वाढविण्याचा निर्णय महाराष्ट्र जलसंपदा प्राधिकरणाने दिनांक ०५ जानेवारी,२०१८ रोजी घेतला आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, शेती, उद्योग आणि घरगुती वापरासाठी वापरल्या जाणाऱ्या पाण्याच्या दरात कशा प्रकारे वाढ करण्यात आली आहे,
(३) असल्यास,मिनरल वॉटर व बिअरला पुरविण्यात येणाऱ्या पाण्याचे दर कशा प्रकारे वाढविण्यात आले आहेत,
(४) असल्यास, शेती, उद्योग आणि घरगुती वापरासाठी वापरल्या जाणाऱ्या पाण्याच्या दरात वाढ करण्याची कारणे काय आहेत ?

**श्री. गिरीष महाजन (१९-०६-२०१८) :** (१) होय.
महाराष्ट्र जलसंपत्ती नियमन प्राधिकरणाचे आदेश क्र. १/२०१८ दिनांक ११ जानेवारी २०१८ अन्वये पाण्याची दरवाढ करण्याचा निर्णय घेण्यात आला आहे.
(२) शेतीसाठी ३५ ते ५० %, औद्यागिक प्रक्रीया उद्योगासाठी ५०% व पिण्याच्या पाण्यासाठी (ग्रा.पं.- १३.६३%, नगरपालीका - १३.९२%, म. न.पा. १९%) दरवाढ करण्यात आली आहे.
(३) मिनरल वॉटर, बिअर उत्पादक कच्चामाल उद्योगांसाठी पाण्याच्या दरात ६५% दरवाढ करण्यात आली आहे.
(४) महाराष्ट्रातील घरगुती, औद्योगिक व कृषी - सिंचन प्रयोजनार्थ वापरल्या जाणाऱ्या पाण्याचे दर यापुर्वी प्राधिकरणाने दि. ३०.०५.२०११ रोजीच्या आदेशान्वये रब्बी हंगाम २०१०-११ पासुन (१५ ऑक्टों. २०१०) लागु केलेले होते. दरम्यान महागाई निर्देशांकामध्ये ६३ % वाढ झालेली आहे. सिंचन प्रकल्पाच्या देखभाल, दुरुस्ती, व्यवस्थापनाचा खर्च पाणीपट्टीतुनच वसुल करावा असे शासनाचे धोरण आहे. व्यवस्थापनाचा खर्च पाणीपट्टी वसुलीपेक्षा जास्त होत असुन प्रकल्पांच्या देखभाल दुरुस्तीस पुरेसा निधी उपलब्ध होत नसल्यामुळे प्रकल्पांच्या देखभालीवर विपरीत परीणाम होत आहे. त्यामुळे महाराष्ट्र जलसंपत्ती नियमन प्राधिकरण अधिनियम २००५ मधील तरतुदीनुसार उक्त निर्णय घेतला आहे.

---

### अकोला जिल्हयातील ग्रामीण भागातील गृहनिर्माण योजनेच्या कामांची मजुरी लाभार्थ्यांना अदा करण्याबाबत

**(२९) १११७६७ (०७-०४-२०१८). श्री.गोवर्धन शर्मा (अकोला पश्चिम) :** सन्माननीय **रोजगार हमी मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) अकोला जिल्हयातील ग्रामीण भागातील गृहनिर्माण योजनेच्या कामांसाठी ९० ते ९५ दिवसांची मजुरी लाभार्थ्यांना मिळत नसल्याची तसेच पंचायत समित्यांमध्ये अकुशल मजुरांचे हजेरीपत्रक दिल्यानंतरही दोन ते तीन महिने मजुरीच अदा होत नसल्याची व त्यातच घरकुलाचा दुसरा व तिसरा हप्ताही अडकत असल्याने हजारो लाभार्थ्यांना सबंधित अधिकाऱ्यांनी वेठीस धरल्याची बाब माहे जानेवारी, २०१८ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आली, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, अभियंते लाभार्थ्यांच्या घरी जाऊन त्यांना भिती दाखवून त्यांच्याकडे थेट पैश्याची मागणी करतात, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, या प्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय व त्यानुसार लाभार्थ्यांना त्यांची मजुरी तात्काळ देण्यासह संबंधित अधिकाऱ्यांवर कारवाई करण्याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. जयकुमार रावल (३०-०६-२०१८) :** (१) हे खरे नाही.

मजुरांना मजुरीची रक्कम हजेरीपत्रक तयार झाल्याच्या दिनांकापासून १५ दिवसाच्या आत अदा करण्यात येते. अकोला जिल्ह्याअंतर्गत तालुक्यामध्ये सन २०१७-१८ या कालावधीमध्ये ८१९७ मजुर लक्षांकापैकी ३१४० घरकुलांचा दुसरा हप्ता व ७३ घरकुलांना तिसरा हप्ता देण्यात आलेला आहे. तसेच जानेवारी-२०१८ वा त्यादरम्यान सर्व हजेरीपत्रकानुसार अदा करण्यात आलेली आहेत.

(२) हे खरे नाही.

अभियंते ग्रामसेवकाला घेऊन लाभार्थ्यांच्या घरकुलाची पाहणी करुन नियमानुसार झालेल्या कामाचे मुल्यांकन करतात.

(३) सदर कामाच्या मजुराची मजुरी रक्कम ऑनलाईनद्वारे त्वरीत त्यांच्या बँक खात्यात जमा होतात. जर मुल्यांकन करण्यास अथवा पैसे पाठविण्यास विलंब झाला तर विलंब करणा-या अधिका-याकडून ०.०५% विलंब शुल्क आकारणी करुन सदर मजुरांना मजुरी अदा करण्यात येते.

(४) प्रश्न उद्भवत नाही.

---

### खालापूर (जि.रायगड) तालुक्यातील पाताळगंगा नदीवर पूल बांधण्याबाबत

**(३०) ११२३६९ (११-०४-२०१८). श्री.भरतशेठ गोगावले (महाड), श्री.सुरेश लाड (कर्जत) :** सन्माननीय **ग्रामविकास मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) खालापूर तालुक्यातील (जि.रायगड) पाताळगंगा नदीवर खालापूर ते धामणी पूल नसल्याने तेथील जनतेला नदीपात्र ओलाडतांना फारच धोकादायक बनले असून पाताळगंगा नदीवर पूल बांधण्याबाबत तेथील व्यापारी वर्ग तसेच लोकप्रतिनिधींनी गेल्या अनेक वर्षापासून मागणी सार्वजनिक बांधकाम विभाग, अलिबाग यांच्याकडे केली आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास,सदर मागणीनुसार पाताळगंगा नदीवर पूल बांधण्याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्रीमती पंकजा मुंडे (०३-०७-२०१८) :** (१) हे खरे नाही. अशा प्रकारची मागणी प्राप्त झाल्याचे आढळून येत नाही.

(२) व (३) खालापूर ते धामणी हा ग्रामीण मार्ग प्रजिमा क्र. २२ पासून सुरु होवून पाताळगंगा नदीवरुन धामणीकडे जातो. खालापूर तालूक्यातील धामणी हे गाव राज्य मार्ग क्र. १०४ वर असून बारमाही रस्त्याने जोडलेले आहे. तसेच धामणी गावापासून खालापूर येथे जाण्यासाठी धामणी ते सावरोली फाटा या राज्यमार्ग क्र. ९३ मार्गे बारमाही स्वरुपाचा पर्यायी रस्ता उपलब्ध आहे. म्हणजेच खालापूर हे गाव राज्य मार्ग क्र. ९३ व राज्य मार्ग क्र. १०४ या रस्त्यांनी बारमाही जोडलेला आहे.

---

## हिंगणघाट (जि.वर्धा) शहरातील वणा नदीतील पाणी कायम राखण्यासाठी करावयाच्या उपाययोजना

**(३१) ११२६८१ (१३-०४-२०१८). श्री.समीर कुणावार (हिंगणघाट) :** सन्माननीय **जलसंपदा मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) हिंगणघाट (जि.वर्धा) शहरातील वणा नदीचे पात्र उन्हाच्या तीव्रतेमुळे सुकले असून बारमाही वाहणारी नदी सध्या कोरडी पडली आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, नदी कोरडी पडली असल्याने पाणीटंचाई निर्माण होणार आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, नदीचे अस्तित्व कायम राखण्याकरीता शासनाने कोणती उपाययोजना केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. गिरीष महाजन (१९-०६-२०१८) :** (१) हिंगणघाट (जि.वर्धा) शहरातील वणा नदीचे पात्र उन्हाच्या तीव्रतेमुळे सध्या पुर्णत: कोरडे पडलेले नाही. सद्यस्थितीत हिंगणघाट शहराजवळील वणा नदी पात्रात पाण्याचा प्रवाह दिसून येतो.

(२) नगर परिषद, हिंगणघाट यांना हिंगणघाट शहराकरिता १०.५२ द.ल.घ.मी. पिण्याचे पाणी निम्न वणा प्रकल्पावरुन आरक्षित आहे. नगर परिषद, हिंगणघाट तर्फे दि. १७.०४.२०१८ च्या पत्रान्वये पाण्याची मागणी प्राप्त असुन मागणीप्रमाणे उन्हाळी सिंचनासाठी कालव्यात सोडलेले पाणी नदीपात्रातून हिंगणघाट शहरासाठी उपलब्ध होत आहे.

(३) प्रश्न उद्भवत नाही.

(४) प्रश्न उद्भवत नाही.

---

## तुळजापूर (जि. उस्मानाबाद) जलयुक्त शिवार योजनेतर्गत मागेल त्याला शेततळे या योजनेच्या अनुदानामध्ये भरीव वाढ करण्याबाबत

**(३२) ११३१८० (०४-०४-२०१८). श्री.मधुकरराव चव्हाण (तुळजापूर) :** सन्माननीय **जलसंधारण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) उस्मानाबाद जिल्हयातील तुळजापूर तालुक्यामध्ये जलयुक्त शिवार योजनेअतंर्गत २०१६-१६ व २०१६-१७ अतर्गत कंपार्टमेंट बंडिंगची कामे निकृष्ट दर्जाची केल्याची निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,

(२) तसेच मागेल त्याला शेततळे या योजनेंतर्गतची ५०% कामेही अद्याप झालेली नसून त्यासाठी दीड लाख अनुदानाचा आवश्यकता आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, याबाबत शासनाने चौकशी केली आहे काय,

(४) असल्यास, चौकशीनुसार निकृष्ट दर्जाची कामे केल्याबाबत दोषींवर कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे,

(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**प्रा. राम शिंदे (१८-०६-२०१८) :** (१) हे खरे नाही.

(२) सदर योजनेंतर्गत लक्षांकाच्या ५७ टक्के काम पूर्ण झालेले आहे. शासन निर्णय दि.१७/२/२०१६ अन्वये शेततळ्याच्या आकारमानानूसार लाभार्थीस अनुदान वितरीत करण्यात येते.

(३), (४) व (५) प्रश्न उद्भवत नाही.

---

## गुढे (ता.भडगांव,जि.जळगांव) येथे जलयुक्त शिवार योजनेत जिल्हा परिषद मार्फत सात बंधाऱ्याची कामे सुरु असल्याबाबत

**(३३) ११३९२९ (०७-०४-२०१८). डॉ.सतीश (अण्णासाहेब) पाटील (एरंडोल) :** सन्माननीय **जलसंधारण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) गुढे (ता.भडगांव,जि.जळगांव) येथे जलयुक्त शिवार योजनेत जिल्हा परिषद मार्फत सात बंधाऱ्याची रु. १.८ लक्ष ची कामे सुरु आहेत, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, सदरील कामाचे टेंडर काढीत असतांना ज्या कंत्राटदारांचे काम सुरु आहे त्यांचे टेंडर काढलेले आहे, हे खरे आहे काय,

(३) असल्यास, सदरील कामांबाबत भडगांव तालुक्याच्या आमसभेत नागरीकांनी अनेक तक्रारी केल्या आहेत, हे ही खरे आहे काय,

(४) असल्यास, याबाबत शासनाने चौकशी केली आहे काय व तदनुसार शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे

(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**प्रा. राम शिंदे (२७-०६-२०१८) :** (१) व (२) होय, हे खरे आहे.

सदर कामाची ई निविदा काढून कमी दर असणाऱ्या मक्तेदाराची निविदा मंजूर केलेली आहे.

(३) व (४) दि.२२/६/२०१७ रोजी पंचायत समिती, भडगाव येथे झालेल्या आमसभेत जलयुक्त शिवार कामांची चौकशी झाल्याशिवाय देयके अदा करण्यात येवू नयेत अशा सूचना आमसभा

अध्यक्ष यांनी दिल्या होत्या. त्यानुषंगाने कार्यकारी अभियंता, जि.प.लघुसिंचन विभाग, जळगाव यांनी मौजे गुढे जि.प.गटातील सर्व कामांची प्रत्यक्ष पाहणी व चौकशी केली असून कामाची गुणवत्ता चांगली असल्याचे आढळून आले आहे. प्रत्येक कामाची शासकिय प्रयोग शाळेतून काँक्रीटच्या ठोकळ्यांची चाचणी घेण्यात आली असून चाचणी अहवाल तांत्रिक दृष्टया योग्य व उत्कृष्ट आहेत.
(५) प्रश्न उद्भवत नाही.

---

**हिंगणघाट (जि.वर्धा) शहरातील वणा नदीवरील पाणी कायम राखण्यासाठी करावयाच्या उपाययोजना**

**(३४) ११४२१५ (१२-०४-२०१८). श्री.समीर कुणावार (हिंगणघाट) :** सन्माननीय **जलसंपदा मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) हिंगणघाट (जि.वर्धा) शहरातील वणा नदीचे पात्र उन्हाच्या तीव्रतेमुळे सुकले असून बारमाही वाहणारी नदी सध्या कोरडी पडली आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, नदी कोरडी पडली असल्याने पाणीटंचाई निर्माण होणार आहे, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, नदीचे अस्तित्व कायम राखण्याकरीता शासनाने कोणती उपाययोजना केली वा करण्यात येत आहे,
(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. गिरीष महाजन (२१-०६-२०१८) :** (१) हिंगणघाट (जि.वर्धा) शहरातील वणा नदीचे पात्र उन्हाच्या तीव्रतेमुळे सध्या पुर्णत: कोरडे पडलेले नाही. सद्यस्थितीत हिंगणघाट शहराजवळील वणा नदी पात्रात पाण्याचा प्रवाह दिसून येतो.
(२) नगर परिषद, हिंगणघाट यांना हिंगणघाट शहराकरिता १०.५२ द.ल.घ.मी. पिण्याचे पाणी निम्न वणा प्रकल्पावरुन आरक्षित आहे. नगर परिषद, हिंगणघाट तर्फे दि. १७.०४.२०१८ च्या पत्रान्वये पाण्याची मागणी प्राप्त असुन मागणीप्रमाणे उन्हाळी सिंचनासाठी कालव्यात सोडलेले पाणी नदीपात्रातुन हिंगणघाट शहरासाठी उपलब्ध होत आहे.
(३) प्रश्न उद्भवत नाही.
(४) प्रश्न उद्भवत नाही.

---

**चासकमान धरणग्रस्तांच्या पुनर्वसनाच्या अधिसूचनेची अंमलबजावणी न झाल्याबाबत**

**(३५) ११४२२० (०१-०४-२०१८). श्री.सुरेश गोरे (खेड आळंदी) :** सन्माननीय **मदत व पुनर्वसन मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) चासकमान धरण प्रकल्पग्रस्तांच्या मागण्यां मान्य करण्यासाठी शेतकऱ्यांनी जनहित याचिका दाखल केली असता शेकऱ्यांच्या हिताचा निर्णय मा.सर्वोच्च न्यालयाने दिला आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, मा.सर्वोच्च न्यालयाने दिलेल्या निर्णयाची शासनाने त्वरित अंमलबजावणी करणे अपेक्षित असताना सन २०१३ पासून अद्याप पर्यंत कोणतीही कार्यवाही विभागामार्फत झालेली नाही असे आढळून आल्याने स्थानिक लोकप्रतिनिधींनी शेतकऱ्यांच्या हितास्तव हायकोर्टाच्या निर्णयाची त्वरित अंमलबजावणी करावी अशी मागणी दिनांक ०१ मार्च, २०१६ रोजी वा त्यासुमारास शासनाकडे केली, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, सदर मागणीनुसार मा.सर्वोच्च न्यायालयाने दिलेल्या निर्णयाची तात्काळ अंमलबजावणी करण्याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. चंद्रकांत पाटील (२७-०६-२०१८) :** (१) होय, हे खरे आहे.
(२) हे ही खरे आहे.
(३) याचिका कर्त्या प्रकल्पग्रस्तांना नोटीस देऊन त्यांची मा. उच्च न्यायालयाच्या निर्णयानुसार पात्रता तपासणेची कार्यवाही सुरु आहे. मा. उच्च न्यायालय, मुंबई यांनी दिलेल्या निर्णयाचे अनुषंगाने मा.सर्वोच्च न्यायालय, दिल्ली येथे विशेष अनुमती याचिका दाखल करण्यात आले असल्याचे क्षेत्रिय कार्यालयाने कळविले आहे.
(४) प्रश्न उद्भवत नाही.

---

**भामा आसखेड प्रकल्पग्रस्तांपैकी १३०३ अपात्र खातेदारांना नुकसान भरपाई मिळण्याबाबत**

**(३६) ११४२२५ (०१-०४-२०१८). श्री.सुरेश गोरे (खेड आळंदी) :** सन्माननीय **मदत व पुनर्वसन मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) भामा आसखेड प्रकल्पामुळे बाधित झालेल्या १४१४ खातेदारांपैकी अपात्र ठरविलेल्या १३०३ खातेदारांना एक रकमी १३१ कोटी नुकसान भरपाई देण्याचा प्रस्ताव जिल्हाधिकारी पुणे यांनी शासनास सादर केला आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, याबाबत शासनाने चौकशी केली आहे काय,
(३) असल्यास, त्यानुसार १३०३ खातेदारांना एक रकमी मोबदला तात्काळ देण्याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे ,
(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. चंद्रकांत पाटील (०२-०७-२०१८) :** (१) होय, हे खरे आहे.
(२) व (३) याबाबत निर्णय घेण्याची कार्यवाही सुरु आहे.
(४) प्रश्न उद्भवत नाही.

---

**वाडा (जि.पालघर) येथे १३९ अंगणवाड्यातील रिक्त पदे भरणेबाबत**

**(३७) ११४३५१ (१०-०४-२०१८). श्री.पास्कल धनारे (डहाणू) :** सन्माननीय **महिला व बालविकास मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) वाडा (जि.पालघर) येथे १३९ अंगणवाड्याचा कारभार दोन मुख्य सेविकावर होत असल्याचे दिनांक २२ डिसेंबर, २०१७ रोजी वा त्यासुमारास निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, याबाबत शासनाने चौकशी केली आहे काय,
(३) असल्यास, त्यानुसार अंगणवाड्यातील रिक्त पदे भरण्याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्रीमती पंकजा मुंडे (१९-०६-२०१८) :** (१) हे खरे आहे.
(२) व (३) मुख्य सेविकेची पदे जिल्हा परिषद स्तरावरुन भरण्यात येतात. राज्यात कार्यरत असलेल्या अंगणवाडया गावातील जवळच्या अंगणवाडयांमध्ये समाविष्ट करता येतील काय, याबाबत आढावा घेण्याचे कामकाज वित्त विभागाच्या सूचनेनुसार आयुक्त, एकात्मिक बाल विकास सेवा योजना, नवी मुंबई कार्यालयामार्फत सुरु आहे. आढाव्या अंती रिक्त पदे भरण्याबाबत निर्णय घेण्यात येणार आहे.
(४) प्रश्न उद्भवत नाही.

---

**मौजे वाघदरा (ता.वेल्हे, जि.पुणे) येथील गुंजवणी चापेट प्रकल्पग्रस्तांचे पुनर्वसन मौ.आडवली (ता.वेल्हे, जि.पुणे) येथील पुनर्वसन गावठाणात करण्याबाबत**

**(३८) ११४४५५ (०१-०४-२०१८). श्री.संग्राम थोपटे (भोर), श्री.जयकुमार गोरे (माण), श्री.भारत भालके (पंढरपूर), श्री.बाळासाहेब थोरात (संगमनेर), श्री.अस्लम शेख (मालाड पश्चिम), श्री.अमिन पटेल (मुंबादेवी) :** सन्माननीय **मदत व पुनर्वसन मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) मौजे वाघदरा (ता.वेल्हे, जि.पुणे) येथील गुंजवणी चापेट प्रकल्पग्रस्तांचे पुनर्वसन मौ.आडवली, (ता.वेल्हे, जि.पुणे) येथील पुनर्वसन गावठाणात होणेबाबत व भूखंड वाटपाबाबत मा.स्थानिक लोकप्रतिनिधींनी मा.उपअधीक्षक अभियंता, पुणे पाटबंधारे प्रकल्प मंडळ पुणे यांना दिनांक २७ ऑक्टोबर, २०१७ रोजी वा त्यासुमारास विनंतीपत्र देऊनही त्यावर अद्याप कार्यवाही झालेली नाही हे खरे आहे काय,
(२) असल्यास, शासनाने चौकशी केली आहे काय,
(३) असल्यास, त्यानुसार सदर प्रकल्पग्रस्तांचे पुनर्वसन करण्याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. चंद्रकांत पाटील (२१-०६-२०१८) :** (१) हे खरे नाही.
(२) प्रश्न उद्भवत नाही.

(३) मौजे वाघदरा ता.वेल्हे जि.पुणे येथील गुंजवणी चापेट प्रकल्पग्रस्तांचे पुनर्वसन मौजे आडवली, ता.वेल्हे, जि.पुणे येथील पुनर्वसन गावठाणात होणेबाबत व भूखंड वाटपाबाबत क्षेत्रिय स्तरावर कार्यवाही चालू आहे.
(४) प्रश्न उद्भवत नाही.

---

## उच्च व तंत्रशिक्षण वैद्यकीय क्षेत्रातील बंधपत्रित सेवा पदव्युत्तर अभ्यासक्रमाआधी पूर्ण करण्याच्या निर्णयाला मिळालेल्या स्थगितीबाबत

**(३९) ११४५९८ (०४-०४-२०१८). ॲड.वारीस पठाण (भायखळा) :** सन्माननीय **वैद्यकीय शिक्षण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) राज्यातील शासकिय व महापालिकेच्या महाविद्यालयांमधून MBBS चे शिक्षण घेणाऱ्या विद्यार्थ्यांना राज्याच्या कोट्यातून पदव्युत्तर प्रवेशासाठी एक वर्षाची बंधपत्रित सेवा पूर्ण केली असली पाहिजे अथवा १० लाख रुपये भरले पाहिजेत असा निर्णय शासनाने जाहीर केला, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, राज्याच्या शासकिय महाविद्यालयांमधून एका विद्यार्थ्याला २२ लाख रुपये वैद्यकीय शिक्षणावर खर्च होत असताना सन २००९-१० च्या कॅगच्या परफॉर्मन्स ऑडिट रिपोर्टनुसार ९० टक्के विद्यार्थी ही शासकीय सेवा देत नाही हे स्पष्ट झाले होते, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, सबसिडी दिलेल्या रकमेतून वैद्यकीय शिक्षण घेतल्यानंतर राज्याच्या गोरगरीब जनतेला आरोग्य सुविधा पुरविण्यासाठी बंधपत्रित सेवा देणे हे डॉक्टरांचे कर्तव्य असताना शासनाने घेतलेल्या या निर्णयाला १ वर्षासाठी स्थगिती देण्याची कारणे काय आहेत,
(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. गिरीष महाजन (२७-०६-२०१८) :** (१) होय, हे खरे आहे.
(२) भारताचे नियंत्रक व महालेखापरीक्षक यांच्या सन २००९-१० च्या नागरी अहवाल क्र.२ मधील कार्यसिध्दी लेखा परीक्षणे (प्रकरण-II) मधील परिच्छेद क्र.२.२.१२ मध्ये 'वैद्यकीय शिक्षण पूर्ण केलेल्या विद्यार्थ्यांची शासकीय सेवा' या शीर्षकाखाली वैद्यकीय शिक्षण पूर्ण केलेल्या ९० टक्के विद्यार्थ्यांनी शासकीय सेवा केली नाही असे नमूद केले आहे.
(३) पदव्युत्तर अभ्यासक्रमाच्या प्रवेश प्रक्रियेपूर्वी किमान १ वर्ष आधी नियमांबाबत उमेदवारांना पुरेशी कल्पना असणे आवश्यक असल्याने पदव्युत्तर अभ्यासक्रमास प्रवेशापूर्वी १ वर्षाची बंधपत्रित सेवा करण्याची अट शैक्षणिक वर्ष २०१९-२० च्या प्रवेश प्रक्रियेपासून लागू होईल अशी सुधारणा शासन शुध्दिपत्रक दिनांक २४/११/२०१७ अन्वये करण्यात आली आहे.
(४) प्रश्न उद्भवत नाही.

---

## राज्यातील मुंबई शहरात बालसुधारगृहांची संख्या वाढविण्यासह बालसुधारगृहांत अत्यावश्यक सेवा उपलब्ध करुन देण्याबाबत

**(४०) ११४६०० (०४-०४-२०१८). अॅड.वारीस पठाण (भायखळा), श्री.इम्तीयाज सय्यद (औरंगाबाद मध्य) :** सन्माननीय **महिला व बालविकास मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) राज्यातील मुंबई शहरात बालसुधारगृहांची संख्या वाढवणे, तसेच बालसुधारगृहांत पूर्णवेळ डॉक्टर, नर्स, औषधांचा पुरवठा, आरोग्यविषयक सेवा पुरवण्याची मागणी विविध सामाजिक कार्यकर्त्यांनी, नागरिकांनी मा.मुख्यमंत्री, मा.मंत्री (महिला व बाल कल्याण विभाग) यांच्याकडे लेखी निवेदनाद्वारे माहे जानेवारी २०१८ मध्ये वा त्यादरम्यान केली आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, राज्यातील बालसुधारगृहांची स्थिती सुधारण्यासह व सध्याच्या परिस्थितीचा आढावा घेण्यासाठी शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्रीमती पंकजा मुंडे (२१-०६-२०१८) :** (१) व (२) अशा आशयाचे कोणतेही लेखी निवेदन अथवा पत्रव्यवहार विभागाकडे प्राप्त झाल्याचे दिसून येत नाही.

तथापि, राज्यातील सर्व बालगृहांची बालगृहांमध्ये दाखल असलेल्या प्रवेशितांना देण्यात येणाऱ्या सोयी-सुविधांबाबत त्रयस्थ यंत्रणांकडून तपासणी करुन त्यांचे अ, ब, क आणि क व्यतिरिक्त अशा श्रेणींमध्ये वर्गीकरण करण्यात आलेले आहे. तसेच, संबंधीत जिल्हा महिला व बाल विकास अधिकारी यांचेकडून वेळोवेळी बालगृहांमध्ये दाखल असलेल्या प्रवेशितांना देण्यात येणाऱ्या सोयी-सुविधांबाबतची तपासणी करण्यात येते.

(३) प्रश्न उद्भवत नाही.

---

## राज्यात वैद्यकीय व आयुर्वेदीक महाविद्यालये उपलब्ध करण्याबाबत

**(४१) ११४६६९ (०५-०४-२०१८). श्री.अजय चौधरी (शिवडी) :** सन्माननीय **वैद्यकीय शिक्षण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) राज्यातील वैद्यकीय, आयुर्वेदीक महाविद्यालयांमध्ये पुरेशा खाटांचे रुग्णालय, प्रयोगशाळा, शल्यचिकित्सागृह, अद्यावत ग्रंथालय व वसतीगृह या आवश्यक सुविधा उपलब्ध नसल्याने महाविद्यालयाची मान्यता रद्द करण्याचा निर्णय शासनाने घेतला आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, वैद्यकीय व आयुर्वेदीक पदवीधर शिक्षण घेण्यासाठी १२ वी उत्तीर्ण झालेल्या विद्यार्थ्यांचा कल जास्त असल्याने वैद्यकीय व आयुर्वेदीक महाविद्यालये मोठ्या प्रमाणात उपलब्ध व्हावेत यासाठी शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. गिरीष महाजन (१२-०७-२०१८) :** (१) हे खरे नाही.

(२) व (३) प्रश्न उद्भवत नाही.

---

**राज्यातील सिमेंट नाला बांधाची कामे मोठ्या प्रमाणात रद्द झाल्याने शेतकऱ्यांच्या वाढलेल्या समस्यांबाबत**

**(४२) ११४८९७ (०४-०४-२०१८). श्री.सुरेश गोरे (खेड आळंदी) :** सन्माननीय **जलसंधारण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) राज्यातील भौगोलिक परिस्थिती/भू-गर्भातील जमिनीचा प्रकार यांचा विचार करता सिमेंट नाला बांध हा पुनर्भरणाचा उपचार असल्याने जमिनीत पाणी किती प्रमाणात मुरते याचे प्रमाण निश्चित करता येत नसल्याने तत्कालीन शासनाने दिनांक १ जानेवारी, २०१४ रोजीच्या शासन निर्णयानुसार सिमेंट नाला बांधाचे मापदंड हे पाणी साठ्याशी निगडीत असणार नसल्याचे जाहीर केले होते, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, सिमेंट नाला बांधाचे मापदंड हे पाणी साठ्याशी निगडीत नसल्याने सन २०१४ पासून २ वर्षे जलयुक्त शिवार योजनेंतर्गत राज्यात अनेक सिमेंट नाला बांधाची कामे होवून पाणी साठ्यात मोठ्या प्रमाणात वाढ झाली, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, शासन निर्णय दिनांक.२३/०९/२०१७ नुसार पुन्हा सिमेंट नाला बांधाचे मापदंड पाणी साठ्याशी निगडीत करण्याचा आदेश दिल्याने मोठ्या प्रमाणात सिमेंट नाला बांधाची कामे रद्द झाली आहेत, हे ही खरे आहे काय,
(४) असल्यास, सिमेंट नाला बांधाचे मापदंड पाणी साठ्याशी निगडीत करण्याचा नव्याने आदेश देण्याची कारणे काय आहेत,
(५) असल्यास, सदर आदेशानुसार राज्यात एकूण किती सिमेंट नाला बांध बांधण्यात आले व एकूण किती पाणीसाठा निर्माण करण्यात आला आहे ?

**प्रा. राम शिंदे (२७-०६-२०१८) :** (१) व (२) होय, हे खरे आहे.
(३) हे खरे नाही.

शासन निर्णय दि.२३/६/२०१७ अन्वये सिमेंट नाला बांधाची कामे रद्द झाली नसून या कामाबाबतच्या भौतिक व आर्थिक मापदंडाबाबत एकत्रित सूचना निर्गमित केल्या आहेत. सदर शासन निर्णयानूसार सिमेंट काँक्रीट नाला बांधाकरिता आर्थिक मापदंड पाणीसाठ्याशी निगडीत आहेत.
(४) सिमेंट नाला बांधाची किंमत ठरविताना पाणी साठ्याच्या तुलनेत सदर किंमत असणे तांत्रिकदृष्ट्या संयुक्तीक आहे.
(५) जलसंधारण यंत्रणेमार्फत एकूण १४६८० सिमेंट नाला बांधाची कामे पूर्ण केली असून १६५८७० सघमी पाणीसाठा निर्माण झालेला आहे.

---

**सांगेली-घोळवेवाडी (ता.सावंतवाडी, जि.सिंधुदुर्ग) परिसरात वन विभागाच्या परवानगीशिवाय कटर मशिनच्या सहाय्याने वृक्षतोड केल्याबाबत**

**(४३) ११४९७६ (१०-०४-२०१८). श्री.नितेश राणे (कणकवली) :** सन्माननीय **वने मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) सांगेली-घोळवेवाडी (ता.सावंतवाडी, जि.सिंधुदुर्ग) परिसरात वन विभागाच्या परवानगीशिवाय ५० ते ६० एकर क्षेत्रात कटर मशिनच्या सहाय्याने उत्पादित लाकूड माल व्यापार करण्याच्या उद्देशाने केलेल्या वृक्षतोडप्रकरणी सहाय्यक वनसंरक्षक (प्रादेशिक) यांनी उपवन संरक्षक, सावंतवाडी यांना दिनांक २९ मार्च, २०१७ रोजी सविस्तर अहवाल सादर केला आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, वनपालांनी सदरहू वृक्षतोड प्रकरणी दिनांक ७ मार्च, २०१७ रोजी प्रत्यक्ष घटनास्थळी केलेल्या पंचनाम्यात केवळ ५ हेक्टर क्षेत्रात वृक्षतोड झाल्याची चुकीची नोंद केली आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, सदर वनपालाने केलेल्या चुकीच्या पंचनाम्याच्या अहवालाप्रकरणी तक्रारी करून या वृक्षतोड झालेल्या क्षेत्राची भूमी अभिलेख कार्यालयामार्फत मोजणी करून किती क्षेत्र खासगी आहे व किती वनसंज्ञेखालील आहे याबाबत मागणी करण्यात आलेली असतानाही अद्यापपर्यंत मोजणी करण्यात आलेली नाही व हद्द निश्चित करण्यात आलेली नाही, हे ही खरे आहे काय,

(४) असल्यास, सदर प्रकरणाचा वरिष्ठ अधिकाऱ्यांमार्फत पुन्हा पंचनामा करून चुकीचा पंचनामा केलेल्या वनपालाविरोधात कारवाई करण्याची मागणी अनुक्रमे दिनांक ८ जानेवारी २०१७ व व १६ जानेवारी, २०१८ रोजी वा त्यासुमारास प्रधान सचिव, वने यांना सादर केले आहे, हे ही खरे आहे काय,

(५) असल्यास, सदरहू तक्रारीच्या अनुषंगाने शासनाने दोषींवर कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे,

(६) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. सुधीर मुनगंटीवार (०१-०६-२०१८) :** (१) हे खरे आहे.

(२) व (३) हे खरे आहे.

(४) सदर विषयाचे दिनांक १६.१.२०१८ चे पत्र शासनास प्राप्त झाले आहे.

(५) व (६) सदर प्रकरणी सहाय्यक वनसंरक्षक (प्रादेशिक) सावंतवाडी यांनी चौकशी करुन दिनांक २९.३.२०१७ अन्वये सादर केलेल्या अहवालानुसार कामात हलगर्जीपणा केल्याबद्दल संबंधित वनक्षेत्रपाल, वनपाल व वनरक्षक यांचेविरुध्द विभागीय चौकशी प्रस्तावित करण्यात आली आहे.

---

### दौंड (जिल्हा पुणे) तालुक्यातील अंगणवाडी बांधकामासाठी निधी मिळण्याबाबत.

**(४४) ११५२१८ (१०-०४-२०१८). श्री.राहूल कुल (दौंड), श्री.संग्राम थोपटे (भोर), श्री.शरददादा सोनावणे (जुन्नर) :** सन्माननीय **महिला व बालविकास मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) दौंड तालुक्यात (जि.पुणे) एकूण ४३३ अंगणवाडी केंद्रे असून त्यापैकी फक्त २३५ अंगणवाडी केंद्रांना इमारत असल्याची माहिती निदर्शनास आली आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, उक्त अंगणवाडी नसलेल्या अंगणवाडी इमारत मिळणेबाबतचा प्रस्ताव बाल विकास अधिकारी दौंड यांनी मुख्य कार्यकारी अधिकारी पुणे जिल्हा परिषद, पुणे यांचेकडे दिनांक २२ डिसेंबर २०१७ रोजी दाखल केला आहे, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, उक्त इमारत नसलेल्या अंगणवाड्यांना इमारत मिळणेबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्रीमती पंकजा मुंडे (१९-०६-२०१८) :** (१) होय, हे खरे आहे.
(२) होय, हे खरे आहे.
तथापि, सदर दिनांकास २७ प्रस्ताव प्राप्त होते.
(३) महिला व बाल विकास विभाग, दिनांक १५ डिसेंबर, २०१७ च्या शासन निर्णयान्वये सन २०१७-१८ पासून जिल्हा वार्षिक योजनेमधून नविन अंगणवाडी बांधकामासाठी ५०% व जुन्या अंगणवाडीमध्ये किरकोळ दुरुस्तीसाठी तसेच ज्या अंगणवाडीमध्ये शौचालये बांधण्यासाठी ५०% प्रमाणे निधी वितरीत करण्यात येणार आहे. CSR अंतर्गत दौंड तालुक्यात ७ अंगणवाडी इमारत बांधकामे मंजूर करण्यात आलेली आहेत.
(४) प्रश्न उद्भवत नाही.

---

**वाळवा (जि.सांगली) तालुक्यातील हजारो एकर ऊसक्षेत्र हुमणी अळीचा प्रादुर्भाव होऊन उध्वस्त झाले असल्याबाबत**

**(४५) ११५२२४ (०१-०४-२०१८). श्री.अमिन पटेल (मुंबादेवी), श्री.अस्लम शेख (मालाड पश्चिम), श्री.आसिफ शेख (मालेगांव मध्य) :** सन्माननीय **कृषी मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) वाळवा (जि.सांगली) तालुक्यातील हजारो एकर ऊसक्षेत्र हुमणी अळीचा प्रादुर्भाव होऊन उध्वस्त झाले असल्याचे माहे सप्टेंबर, २०१७ मध्ये वा त्या दरम्यान निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, त्यातच अवकाळी पाऊस व वादळी वारे यांच्यामुळे ऊसपिक भुईसपाट झाले आहे, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, शासनाने चौकशी केली आहे काय,
(४) असल्यास, त्यानुसार नुकसान झालेल्या ऊसपिकांचे पंचनामे करुन बाधित शेतक-यांना आर्थिक मदत देण्याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली आहे वा करण्यात येत आहे,
(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. चंद्रकांत पाटील (१०-०७-२०१८) :** (१) अंशत: खरे आहे. सांगली जिल्ह्यातील वाळवा तालुक्यात ऊस पिकाखाली एकुण २४,४२३ हेक्टर क्षेत्रापैकी ४१७ हेक्टर क्षेत्रावर हुमणी अळीचा प्रादुर्भाव झाला होता. सदर नुकसानीची तीव्रता ही ५ ते १० टक्के इतकीच आहे व सबब सदर

क्षेत्राचे नुकसान अत्यंत मर्यादित स्वरुपात होते. ते संपूर्ण क्षेत्र उपचारीत करण्यात आले आहे.
(२) अवकाळी पाऊस व वादळी वारे यांच्यामुळे ऊस पिकांचे नुकसान झाले नाही.
(३), (४) व (५) प्रश्न उद्‍भवत नाही.

---

**चिखली (जि.बुलढाणा) तालुक्यातील वनक्षेत्रातील गावामध्ये**
**वन्य प्राण्याची होणारी बेकायदेशीर शिकार**

**(४६) ११५३४४ (१०-०४-२०१८). श्री.नितेश राणे (कणकवली) :** सन्माननीय **वने मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) चिखली (जि.बुलढाणा) तालुक्यातील धोत्रा नाईक, किन्ही नाईक, वडाळी, मोहना, मांडवा, इसोली, धानोरी, हिवरा, अंबाशी, पार्डी-घुटी, हिवरा नाईक या वनक्षेत्रातील गावांमध्ये मोठया प्रमाणावर मागील माहे नोव्हेंबर २०१७ पासून शिकाऱ्याकडून विनापरवाना ड्रोन कॅमेरा, व्हिडिओ कॅमेराद्वारे शुटींग करून बंदूकीसह इतर हत्यारामार्फत वन्य प्राण्यांच्या शिकारीचे सर्रासपणे सुरू आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, वन अधिनियम १९२७ नुसार वनपरिक्षेत्रात छायाचित्रण अथवा चित्रीकरण करावयाचे झाल्या संबंधित विभागाची परवानगी घेणे आवश्यक असते तसेच वन्य प्राण्याची शिकार करणे हा गंभीर गुन्हा असताना कार्यक्षेत्रातील सदरहू गावांमध्ये माहे नोव्हेंबर, २०१७ पासून सर्रासपणे वन्य प्राण्याची शिकार होत असल्याने याप्रकरणी दिनांक १० जानेवारी, २०१८ रोजी व तद्‍पूर्वी उपवनसंरक्षक, बुलढाणा, वन विभाग, बुलढाणा, जिल्हाधिकारी, बुलढाणा निवासी उप जिल्हाधिकारी आदीकडे श्री.अनंता हरीनारायण पानगोळे व अन्य ग्रामस्थांनी धोत्रा नाईक (ता.चिखली, जि.बुलढाणा) यांनी लेखी निवेदनाद्‍वारे तक्रारीही करण्यात आल्या आहेत, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, सदरहू तक्रारीनुषंगाने शासनाने चौकशी केली आहे काय व त्यात काय आढळून आले,

(४) असल्यास, त्यानुसार सदरहू वनक्षेत्रातील गावामध्ये वन्य प्राण्याच्या बेकायदेशीर होणाऱ्या शिकारीवर आळा घालण्यासाठी उपाययोजना करण्यासह शिकाऱ्यांवर कारवाई करण्याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. सुधीर मुनगंटीवार (२४-०५-२०१८) :** (१) हे खरे नाही.

चिखली (जि.बुलढाणा) तालुक्यातील धोत्रा नाईक, किन्ही नाईक, वडाळी, मोहना, मांडवा, इसोली, धानोरी, हिवरा, अंबाशी, पार्डी-घुटी, हिवरा नाईक या वनक्षेत्रातील गावांमध्ये मोठया प्रमाणावर माहे नोव्हेंबर २०१७ व त्या दरम्यान शिकाऱ्याकडून विनापरवाना ड्रोन कॅमेरा, व्हिडिओ कॅमेराद्‍वारे शुटींग करून बंदूकीसह इतर हत्यारामार्फत वन्य प्राण्यांच्या शिकारी घडल्याची बाब निदर्शनास आली नाही.

(२) हे खरे आहे.

दिनांक १० जानेवारी, २०१८ रोजी श्री. अनंता हरीनारायण पानगोळे, रा. धोत्रा नाईक ता.चिखली जि. बुलढाणा व श्री. गजानन वामन ननकर, रा किन्ही नाईक ता.चिखली जि.बुलढाणा यांनी या प्रकरणी उपवनसंरक्षक, बुलढाणा यांचेकडे लेखी तक्रार केली आहे.

(३) सदर तक्रारीच्या अनुषंगाने उपवनसंरक्षक, बुलढाणा यांचेमार्फत चौकशी करण्यात आली असून चौकशीमध्ये खालील बाबी आढळुन आल्या आहेत :-

१. ड्रोन कॅमे-याने शुटींग ही सारंगवाडी तलावाच्या भिंतीसाठी चित्रीकरण करण्यासाठी केलेली असुन, वन्यप्राण्यांच्या शिकारीसाठी शोध घेण्याच्या उद्देशाने करण्यात आलेली नाही.

२. चिखली (जि.बुलढाणा) तालुक्यातील धोत्रा नाईक, किन्ही नाईक, वडाळी, मोहना, मांडवा, इसोली, धानोरी, हिवरा, अंबाशी, पार्डी-घुटी, हिवरा नाईक या वनक्षेत्रातील गावांमध्ये दहा-बारा वर्षापासून वन्यप्राण्यांची शिकार झाल्याची बाब आढळुन आली नाही.

३. सदर तक्रार ही संशयावरून करण्यात आली आहे.

(४) वन्यप्राण्यांच्या होण-या शिकारीवर आळा घालण्यासाठी खालीलप्रमाणे उपायायोजना करण्यात येतात :-

१. वन्यप्राण्यांच्या हालचालींवर नजर राहावी तसेच शिकारीला व अपघाताला आळा बसावा या दृष्टीने संवेदनशील वनक्षेत्रात वनकर्मचा-यांकडून गस्त करण्यात येते. तसेच ट्रॅप कॅमेरा लावुन वन्यप्राण्यांचे हालचालींवर संनियंत्रण करण्यात येते.

२. वनपरिक्षेत्रामधील जाणा-या विद्युत लाईनवर नियमितपणे गस्त करण्यात येते. तसेच विद्युत विभागतील अधिकारी / कर्मचारी यांचेशी नियमितपणे संपर्क ठेवला जातो.

३. सुरक्षित क्षेत्रामध्ये वने व वन्यजीवांचे प्रभावीरित्या संरक्षण करण्यासाठी संवेदनशील क्षेत्रात मोक्याच्या ठिकाणी संरक्षण कुटीची उभारणी करण्यात आलेली आहे. सदर कुटींवर वनकर्मचारी रोजंदारी मजुर २४ तास राहुन नेमुन दिलेल्या क्षेत्रात नियमीतपणे गस्त करतात. वरिष्ठ अधिकारी वेळोवेळी संरक्षण कूटीला भेटी देतात.

(५) प्रश्न उद्‌भवत नाही.

---

**वैद्यकीय प्रवेशाबाबतचा डोमिसाईल अध्यादेश प्रलंबित असल्याबाबत**

**(४७) ११५६१६ (०५-०४-२०१८). श्री.महेश (दादा) लांडगे (भोसरी) :** सन्माननीय **वैद्यकीय शिक्षण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) राज्यातील शासकीय व खासगी वैद्यकीय महाविद्यालयामध्ये एमडी, एमएस, एमडीएस पदव्युतर पदविका प्रवेश घेण्यासाठी विद्यार्थी महाराष्ट्राचा रहिवासी असणे असा निर्णय डीएमईआर माहे नोव्हेंबर, २०१७ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास घेतला आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, या निर्णयाचा अध्यादेश राज्याच्या वैद्यकीय विभागाने जाहीर केला नाही, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, याबाबत शासनाने चौकशी केली आहे काय व त्यानुसार शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. गिरीष महाजन (२७-०६-२०१८) :** (१) याबाबतची सूचना वैद्यकीय शिक्षण व संशोधन संचालनालयाच्या संकेतस्थळावर प्रसिध्द करण्यात आली होती.

(२) दिनांक ३०/०१/२०१८ रोजीच्या अधिसूचनेद्वारे वैद्यकीय/दंत पदव्युत्तर अभ्यासक्रमाच्या प्रवेश नियमांमध्ये सुधारणा करण्यात आली असून त्यानुसार सदर अभ्यासक्रमांच्या राज्य कोटयातील प्रवेशासाठी उमेदवार महाराष्ट्र राज्याचा अधिवासी असण्याची बाब पात्रता निकषांमध्ये समाविष्ट करण्यात आली आहे.

(३) प्रश्न उद्भवत नाही.

(४) प्रश्न उद्भवत नाही.

---

**जालना जिल्हयातील अंबड-घनसावंगी तालुक्यातील शेतकऱ्यांच्या पिकांचे वन्यप्राण्यांकडून होत असलेले नुकसान**

**(४८) ११५६६९ (३१-०३-२०१८). श्री.राजेश टोपे (घनसावंगी) :** सन्माननीय **वने मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) जालना जिल्हयातील अंबड-घनसावंगी तालुक्यातील शेतकऱ्यांच्या पिकांचे वन्यप्राण्यांकडून मोठया प्रमाणात नुकसान केले जाते, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, वन्यप्राण्यांकडून होत असलेले शेतकऱ्यांच्या पीकांचे नुकसान टाळण्यासाठी तेथील शेतकऱ्यांनी पिकांना संरक्षक मिळणेबाबत विनंती केली आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, त्यानुसार शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे.

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. सुधीर मुनगंटीवार (०७-०६-२०१८) :** (१) जालना जिल्हयातील अंबड-घनसावंगी तालुक्यात सन २०१८ मध्ये वन्यप्राण्यांकडून शेतपीक नुकसानीचे ३६ प्रकरणे निदर्शनास आली असून प्रचलित शासन निर्णयातील तरतुदीनुसार संबंधितांना एकूण रु. ०.८०५ लक्ष अर्थसहाय्य अदा करण्यात आले आहे.

(२) हे खरे नाही.

(३) प्रश्न उद्भवत नाही.

(४) प्रश्न उद्भवत नाही.

---

**मनोरा (जि.वाशिम) या तालुक्यातील ३८ अंगणवाडीच्या इमारतीचे बांधकाम अपूर्ण असल्याबाबत**

**(४९) ११६००५ (१०-०४-२०१८). श्री.अमित झनक (रिसोड) :** सन्माननीय **महिला व बालविकास मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) मनोरा (जि.वाशिम) या तालुक्यातील ३८ अंगणवाडीच्या इमारतीचे बांधकाम सन २०११ सुरु करण्यात येवूनही अदयापी पूर्ण करण्यात आले नसल्याचे माहे फेब्रुवारी २०१८ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, सदरहू अंगणवाडीच्या इमारतीच बांधकाम तात्काळ पूर्ण करण्याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्रीमती पंकजा मुंडे (१९-०६-२०१८) :** (१) होय, हे खरे आहे.

सद्य:स्थितीमध्ये मानोरा तालुक्यातील ४१ मंजूर अंगणवाडी बांधकामापैकी एकूण ३ इमारत बांधकामे पूर्ण, ३१ इमारत बांधकामे अपूर्ण व ७ इमारत जागेअभावी रद्द करण्यात आलेली आहे.
(२) संबंधित ग्रामपंचायतीने अपूर्ण बांधकामे १४ वा वित्त आयोगाअंतर्गत आराखडयामध्ये समाविष्ट करुन पूर्ण करण्याकरीता वाशिम जिल्हा परिषदेने निर्देश दिलेले आहेत.
(३) प्रश्न उद्भवत नाही.

---

### अंबरनाथ (जि.ठाणे) येथील गार्डीयन डेंटल कॉलेजच्या गैरकारभाराबाबत

**(५०) ११६०३२ (०५-०४-२०१८). श्री.शिवाजीराव कर्डिले (राहुरी), श्री.संतोष दानवे (भोकरदन), श्री.नारायण कुचे (बदनापूर) :** सन्माननीय **वैद्यकीय शिक्षण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) अंबरनाथ (जि.ठाणे) येथील गार्डीयन डेंटल कॉलेजला ॲडमिशनसाठी शुल्क घेवूनही प्रवेश न देता भरलेली रक्कम कॉलेज परत करत नसल्याने कॉलेजच्या संचालकांविरोधात अंबरनाथ पोलीसात गुन्हा दाखल करण्यात आला आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, या प्रकरणी चौकशी केली आहे काय,
(३) असल्यास, चौकशीत काय आढळून आले आहे व त्याअनुषंगाने शासनाने संबंधितांवर कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे,
(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. गिरीष महाजन (२७-०६-२०१८) :** (१) होय हे खरे आहे.
(२) व (३) पोलिसांमार्फत केलेल्या चौकशीच्या निष्कर्षानुसार गार्डीयन कॉलेज ऑफ डेन्टल सायन्सेस, अंबरनाथ (प) यांचे संचालक आफान रशिद शेख यांच्याविरुध्द गुन्हा दाखल करण्यात आला आहे. सदर प्रकरणी आरोपीस दिनांक १४/०१/२०१८ रोजी अटक करण्यात आली

असता मा.न्यायालयाने आरोपीस दोन दिवसांची पोलीस कस्टडी दिली होती. त्यानंतर मा.न्यायालयाने त्यास जामीनावर सोडले आहे. उक्त प्रकरणी पोलीस तपास सुरु आहे.
(४) प्रश्न उद्भवत नाही.

---

**विधान भवन :**
**नागपूर.**

**डॉ. अनंत कळसे**
**प्रधान सचिव,**
**महाराष्ट्र विधानसभा.**

---

मुद्रणपूर्व सर्व प्रक्रिया महाराष्ट्र विधानमंडळ सचिवालयाच्या संगणक यंत्रणेवर
मुद्रण: शासकीय मध्यवर्ती मुद्रणालय, नागपूर.